# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०३/०१/२००८

लालबहाद्दुर शास्त्री स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला,
दि. ०३/०१/२००८

आज गुरूवार दि. ०३/०१/२००८ रोजी स्थायी समितीची सभा सुचना क्र. ०६ दि. २७/१२/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरिल विषयांवर विचार विनिमय करण्याकरिता लाल बहाद्दुर शास्त्री, स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे सकाळी ११.०० आयोजित करण्यांत आलेली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ६) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ७) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ८) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| १०) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ११) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १२) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १३) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १४) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| २) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

आजच्या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य,सदस्या,तसेच उपस्थित असलेले सर्व अधिकारी वर्ग, हरेश पाटील, नगरसचिव, मा. उपायुक्त साहेब, यांचे स्वागत करतो. व सचिवांनी सभेला सुरुवात करावी. अशी विनंती करतो.

( नगरसचिव यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

( नगरसचिव यांनी प्रकरण क्र. १५ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरूवार दि. ०३/०१/२००८ रोजी सकाळी ११.०० वा. मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०६ दि. २७/१२/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. प्रकरण क्र. १५, दि.२०/०६/२००७ व दि. २०/११/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**शानु गोहिल :-**

मा. सभापतींच्या परवानगीने प्रकरण क्र. १५, दि. २०/०६/२००७ व दि. २०/११/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. दि. २०/०६/२००७ व दि. २०/०१/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरूस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर.

**प्रकरण क्र. १५ :-**

दि. २०/०६/२००७ व दि. २०/११/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०८ :-**

दि. २०/०६/२००७ व २०/११/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल.** **अनुमोदन:- श्रीम. सुनिता पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६, एम.आय.डी.सी. कडून मंजुर ३५ एम.एल.डी. पाणी पुरवठाकामी रू. २.५२ कोटी अनामत रक्कम भरणेस व पाणी पुरवठा राखीव निधी ठेवीतील रक्कम मुदतपुर्व काढणेस मंजुरी देणेबाबत.

**सुनिता पाटील :-**

साहेब, ठराव मांडण्यापुर्वी मी एक असा प्रश्न विचारते की, मिरा भाईंदर शहरामध्ये भरपूर कमी पाणी येते. आत्ताच दोन दिवसांपुर्वी श्री. चेतन म्हात्रे साहेबांनी सगळ्यांना फोन करून सांगितले की, वीस टक्के पाणी कपात होणार आहे. तर ही कपात कोणत्या दिवसापासुन होणार आहे?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो परवा आपणाला जो फोन केला होता. तो फोन असा होता की, त्या दिवशी दोन दिवस पाणी एकदम कमी प्रेशरने येत होते. तिकडे हाय व्होल्टेज झाल्यामुळे आणि पातलीपाड्याला प्रॉब्लेम झाल्यामुळे आपल्याला बायपासने पाणी सोडलेले होते. पाणी अतिशय कमी प्रेशरने होते. त्यामुळे आम्ही सर्व सन्मा. नगरसेवकांना फोन केला होता की, असा असा प्रॉब्लेम आहे. एक दोन दिवस तिकडून पाणी कमी दाबाने येते. याच्यासाठी फोन केला होता आणि तुम्ही दुसरा प्रश्न विचारला की, वीस टक्के पाणी कपात कधीपासुन? तर मी मागच्या मा. स्थायी समितीपुढे जे विधान केले होते ते आजही आहे की, आजच्या तारखेपर्यंत आपल्याला शासनाकडून असे पत्र किंवा कोणत्या खात्याकडून अधिकृत सुचना आलेली नाही. परंतु, वर्तमानपत्रातील बातम्यांवरून व काही अधिका-यांनी दूरध्वनी वरून फक्त कल्पना दिलेली आहे की, अशी मिटींग चाललेली आहे. परंतु, आजपर्यंत आपल्या हातामध्ये अधिकृतपणे काही नाही.

**शरद पाटील :-**

अधिकृतपणे आले नाही मग श्री. चेतन म्हात्रे यांनी पाणी कपात होणार आहे म्हणून कसे सांगितले?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

मी कल्पना दिली. श्री. चेतन म्हात्रे आणि आम्ही सर्व नगरसेवकांना फोन केला की, पाणी कमी येते. दोन दिवस प्रॉब्लेम झाला होता. स्टेम कडून येणारा पाणी पुरवठा कमी येतो. त्यामुळे पाण्याचा सप्लाय हा जास्त हवर्सवर चाललेला आहे.

**शरद पाटील :-**

तुमचा तो विषय बरोबर आहे. पाणी कमी येते म्हणून तुम्ही फोन केला. पण त्यांचे असे म्हणणे आहे की, वीस टक्के कपात होणार आहे असा त्यांना फोन आला.

**एस. ए. खान :-**

पेपरमध्ये पण आलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, आपल्या मिटींगला श्री. दिपक खांबित साहेब नाहीत. जरा बोलवून घ्या. ते आपल्या महापालिकेचे अधिकारी आहेत.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

वर्तमान पत्रामध्ये आहे. आपले नाव नाही. आपल्याकडे कात्रणे आहेत. मी तुम्हाला वाचून दाखवतो.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, मिटींगला सुरूवात झालेली आहे. माझ्या आत्ता लक्षात आले की, मा. आयुक्त साहेबांनी आपल्याला गोषवारा दिलेला आहे. तर त्यांना त्या गोषवाऱ्यावर सही करण्याचा अधिकार आहे का? कारण त्यांनी आपल्याला २७ तारखेला गोषवारा दिलेला आहे. आणि त्यांच्याकडून १३ तारखेलाच चार्ज काढला.. तर त्यांना हा गोषवारा द्यायचा अधिकार आहे का? नाहीतर आपण हे ठराव पास करायचे आणि नंतर ते रद्द व्हायला नको. पहिल्यांदा त्याचा खुलासा व्हावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने मी खुलासा करतो की, तत्कालीन आयुक्त साहेबांनी हा गोषवारा शासनाने कामकाजाचे जे निर्बंध लादले होते त्याच्या पुर्वी मा. स्थायी समितीच्या कामकाजासाठी दिला होता. शासनाचे निर्बंध १७ तारखेपासून कार्यान्वित झाले. दरम्यानच्या काळात हा विषय चर्चेला आला नव्हता.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, परत एकदा बोला माझे लक्ष नव्हते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

श्री. गायकवाड, माजी सेवानिवृत्त आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी या विषयाचा जो गोषवारा दिलेला होता. तो शासनाने त्यांच्या कामकाजावर निर्बंध टाकण्याच्या पूर्वी नगरसचिवांकडे दिलेला होता. आणि तो विषय विषय पत्रिकेत आला नव्हता पण येणाऱ्या पुढच्या सभेत येण्याची संभावना आहे. शासनाने कामकाजावर ज्या वेळेस निर्बंध टाकले होते. तेव्हा ही बाब शासनाच्या निदर्शनास अवगत करण्यात आलेली आहे. असा असा गोषवारा मा. स्थायी समितीच्या निर्णयासाठी दिलेला आहे. तो पुढे कामकाजात येउ शकतो. शासनाकडून त्याच्यावर काही आलेले नाही आणि ०१ तारखेला शासनाने मा. आयुक्त साहेबांचे निर्बंध उठवलेले आहेत. आपण त्याच्यावर कामकाज करू शकतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही सांगता की, ही साहेबांची आधीची टिपणी आहे. मग मागच्या दोन मिटींगमध्ये विषयपत्रिका नाही. म्हणून आढावा घेण्याचा विषय चालू होता. त्यावेळी विषय का आणले नाहीत? पाण्याचा आढावा, कर आकारणीचा आढावा हे महत्वाचे विषय जेव्हा होते.

**मा. सभापती :-**

मागच्या मिटींगला मी तुम्हाला सर्वांना सांगितलेले. आपण सर्वांचे रिव्ह्यु करत होतो. म्हणून मी तो विषय मागे ढकलला होता आणि त्यासाठी आपण गेल्या आठवड्यात तो विषय घेतलेला. तरी तो या आठवड्यामध्ये आपण तो ठराव मंजूर करण्यासाठी आणलेला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रकरण क्र. २४ ची टिपण्णी केव्हाची आहे? तुम्ही सांगता जुनी टिपणी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

जुनी किंवा नवीन यांचा भेद नाही. मा. सदस्यांनी मा. आयुक्तांच्या कामकाजाच्या निर्बंधाच्या विषयी जो विषय मांडला होता. ही बाब शासनाच्या निदर्शनास लेखी आणलेली आहे. की, असा गोषवारा मा. स्थायी समितीकडे सादर केलेला आहे. त्याच्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. पण भविष्यात निर्णय होउ शकतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमचे एवढेच म्हणणे आहे की, प्रकरण क्र. २४ जे आहे, १९२, १९३ रक्तपेढीच्या ठिकाणी लिफ्ट लावणे, ही टिपणी कधीची आहे. यांच्यावर मा. आयुक्त यांच्या मान्यतेने लिहले आहे. इकडे शहर अभियंता यांची सही आहे. याचा खुलासा करा. म्हणजे आत्ता मा. आयुक्तांच्या विषय चालू आहे ना?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मागे आपली मा. महासभा याच कारणाने तहकुब झाली होती. तर त्याच्या नंतर तुम्ही ही मा. स्थायी समिती सभा लावली.

**शरद पाटील :-**

साहेब, मा. आयुक्तांच्या मान्यतेने डेट नसते हे बरोबर आहे. पण आता शासनाकडून जे पत्र आले. याच्यामुळे आम्ही डेट विचारतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

त्या पत्राच्या पूर्वीच नगरसचिवांकडे हे दिलेले आहे. हा विषयसुध्दा निर्बंध टाकण्यापूर्वीच नगरसचिवांकडे दिला.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांचे म्हणणे असे आहे की, तो विषय अगोदर का आणला नाही? आणि आत्ता का आणला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

विषय घेण्याचे अधिकार मा. सभापतींचे आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

आहेत, पण त्यावेळी आपल्याकडे विषयपत्रिकेवर विषयच नव्हते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आत्ता आपल्याला ज्या विषयावर चर्चा करायची आहे. ते कामकाज शासनाने विड्रॉअल केलेले आहे. आपण त्याच्यावर निर्णय करायचा किंवा नाही, का महत्वाचा विषय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग या लोकांनी मा. महासभा कशामुळे तहकुब केली? या लोकांनी मा. महासभा याच बेसवर तहकुब केली की, मा. आयुक्तांना अधिकार नाहीत. आणि म्हणून सभा तहकुब करा. मग ही मिटींगपण तहकुब केली पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी एक खुलासा करु इच्छितो. मा महासभेचे कामकाज मा. महापौरांनी चालविण्याच्या परिस्थितीमध्ये नसल्यामुळे तहकुब केलेले. तिकडचे वातावरण तापलेले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्तांना अधिकार  नाहीत. म्हणून वातावरण तापले होते. मग मा. आयुक्तांनी टिप्पणी कशा काढल्या? गोषवारे कसे काढले? त्या सन्मा. सदस्यांनी गोंधळ घातला. त्याच्यामुळे  सभा तहकुब केली ना? म्हणजे याचा अर्थ हे जे गोषवारे काढलेले आहेत. हे सगळे गोषवारे चुकीचे आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा प्रस्ताव दिला १४ तारखेला आणि १३ तारखेला फॅक्स आलेला आहे. मग सचिवांनी १४ तारखेला कसा घेतला?

**मा. सभापती :-**

आत्ता तुम्ही एवढा वेळ बोलत होते की, पाहिले पाणी पास करा. पाण्याचा विषय चालू आहे. तो मंजुर करतो. तो पहिल्यांदा होउ द्या. एक-एक विषय मंजुर करुन घ्या.

(सन्मा. सदस्या सुनिता पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन सभागृहासमोर केले.)

**सुनिता पाटील :-**

एम.आय.डी.सी. कडील प्रति दिन ३५ एम.एल.डी. पाणी पुरवठा योजनेसाठी अनामत रक्कम रु. २.५२ कोटी (अक्षरी रुपये दोन कोटी बावन्न लाख मात्र) भरणा करणेंसाठी पाणी पुरवठा राखीव निधीतील एफ.डी. न तोडता जकातीचे हफ्ते आल्यावर व महापालिकेच्या जमा झालेल्या वसुलीद्वारे एम.आय.डी.सी. ला अनामत रक्कम भरणेत यावा असा मी ठराव मांडत आहे.

**एस. ए. खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

म्हणजे जो पर्यंत रक्कम जमा होत नाही.

**मा. सभापती :-**

एक हफ्त्यामध्ये दिड कोटी येतील. १५ दिवसांमध्ये रक्कम भरली जाईल. आपण नुकसान करुन घेत नाही. पंधरा दिवसांमध्ये पैसे भरले जातील. त्यांना मी ॲडवान्समध्ये घ्यायला सांगतो. एक हफ्ता ॲडवान्यमध्ये मागा. म्हणजे आपण सात दिवसातसुध्दा भरु शकतो.

**शरद पाटील :-**

पंधरा दिवसात पैसे वसुल होतील याची गॅरेंटी आहे का?

**मा. सभापती :-**

ऑक्ट्रायचे पैसे येतातच.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्हाला एफ.डी. तोडायची नाही असे म्हणायचे आहे का?

**मा. सभापती :-**

होय. एफ.डी. तोडायची नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही बोलतो हा पाण्याचा विषय ज्वलंत आहे. तुम्ही एफ.डी. तोडा.

**मा. सभापती :-**

सात दिवसात पैसे भरुन घेतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही रेट ऑफ इंटरेस्ट बघा. ६.२५ टक्के, ६.२५ टक्के, ६.७५ टक्के, ८.३५ टक्के आणि ७.०० टक्के. साहेब, आजच्या तारखेला मार्केटमध्ये बँक इंटरेस्ट जवळजवळ ९.०० टक्के पर्यंत आलेला आहे. मग तुम्ही हे लॉस कशाला सहन करता? तुम्हाला एफ.डी. तोडायला लागेल.

**मा. सभापती :-**

कशासाठी?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आज रेट ऑफ इंटरेस्ट कमी आहे. आपल्याला मार्केटमध्ये रेट ऑफ इंटरेस्ट जास्त मिळतो. बॅसिन कॅथलिक बँकेमध्ये, नॅशनलाइज बँकेमध्ये, ओरिएन्टल बँकेमध्ये, इंडीयन बँकेमध्ये, सगळ्यामध्ये ९ टक्केने रेट ऑफ इंटरेस्ट आहे. मग तुम्ही हा ६.२५ टक्के रेट ऑफ इंटरेस्ट कसा ॲक्सेप्ट करता? तुम्ही एफ.डी. तोडायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

मा. महासभेत तसेच बोलणार की, एफ.डी. तोडली आणि लॉस करुन घेतला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पाण्याबद्दल कोणीही बोलणार नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तुमच्या परवानगीने मी बोलतो. आर.एन. कोटीयन हा बिल्डरआहे. त्या बिल्डरचे पाण्याचे कनेक्शन आपल्या मा. आयुक्तांनी काढून घेतले. कारण तो सुमारे साठ लाख रुपये आपला कर भरणार होता. आणि काल त्याचा नळ कसा जॉईन्ट केला? मला त्याचे उत्तर द्यावे कारण त्याने साठ लाख रुपये भरलेच नाही. मग त्याचा नळ काढला होता तो जॉईंट कसा झाला? त्याने साठ लाख रुपये भरले का? याचे उत्तर पाहिजे. भरले असतील तर त्याची पावती आम्हांला दाखवा.

**शिवाजी बारकुंड :-**

आत्ता सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याबाबत कर निर्धारक व संकलक यांचे आमच्या पाणी पुरवठा विभागाला पत्र आले होते. त्या पत्राच्या अनुषंगाने तेथील प्रभाग अधिकारी यांच्या समवेत आमचे मेस्त्री जाउन नळ जोडणी खंडीत करण्यांत आलेली आहे. तसे आम्ही लेखी टॅक्स विभागालासुद्धा कळविण्यांत आलेले आहे. आणि आत्ता जे आपण बोलता की पुर्नजोडणी तर पाणी पुरवठा विभागाने पुर्नजोडणी केलेलीच नाही. आत्ता आपण बोलत असाल तर मी दुरध्वनीवरुन ताबडतोब संबंधितांना तिथे पाहणी करायला सांगतो. आणि तुम्हांला दहा मिनिटात कळवतो. कारण पाणी पुरवठा विभागाने नळ जोडणी खंडीत केलेली आहे.

**नयना म्हात्रे :-**

साहेब आपल्याकडे असे कितीतरी बिल्डर आहेत की ज्यांचा करोडो रुपये टॅक्स आपल्याकडे येणार आहे आणि त्यांचे कापलेले कनेक्शन आपण परत लावले. ते वसुली करा. आपल्याला एफ.डी. तोडायची गरज नाही. तुम्ही पहिल्यांदा वसूली करा.

**शरद पाटील :-**

वसूली करा. त्याला मनाई नाही. वसूली तर व्हायलाच पाहिजे. पण आत्ता जो पाण्याचा ज्वलंत विषय आहे. आत्ता ज्याप्रमाणे बोलले गेले वीस टक्के पाणी कपात होणार आहे आणि ती पाणी कपात जर उद्यापासून जानेवारीमध्ये लावली तर मग कुठे जायचे? पंधरा दिवस कोणाची वाट बघत बसायचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमचासुद्धा ठराव आहे.

**शरद पाटील :-**

आम्ही आमचा ठराव मांडतो.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब आम्ही आमचा ठराव मांडतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेस एम.आय.डी.सी. तर्फे ३५ एम.एल.डी. प्रतिदिन पाणी पुरवठा करणेकामी अनामत रक्कम दोन कोटी बावन्न लाख रुपये प्रदान करणेकरिता पाणी पुरवठा राखीव निधीमधून भरावयाची आहे. तरी वरीलप्रमाणे दोन कोटी बावन्न लाख रुपये अनामत भरण्यास मुदतपूर्व ठेवी वटविण्याचा ठराव मी मांडत आहे.

**टेरी परेरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. प्रकरण क्र. १६ करिता दोन ठराव आलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागचे जे ऑफीसर गेले त्यांच्यावर पाच लाखाची थकबाकी आहे. त्यांची थकबाकी वसूल करुन दाखवा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

वसूली तुम्ही करणार आहात की, अधिकारी करणार आहेत?

**शरद पाटील :-**

अधिकारी करणार आहेत. मग जाउ द्या. पाच लाखाचे नुकसान होते ते होउ द्या. पाण्यासाठी आहे. लोकांना प्यायला पाणी पाहिजे म्हणून होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पाणी योजना ही प्रॉफीट कमविण्यासाठी नाही.

**शरद पाटील :-**

असे प्रॉफीट जर कमवायला गेलो तर नगरपालिका भरपूर आहेत. पण ते आपण करत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण ज्या एफ.डी. ठेवल्या आहेत. त्याच्यामध्ये बँक इंटरेस्ट खूप कमी आहे. आत्ता लेटेस्ट आपल्याकडे आपण आठ टक्के ते नउ टक्के पर्यंत इंटरेस्ट मागवले आहेत. मग हे ६.२५ आणि ६.७५ मतलब नाही. याच्यामध्ये आपल्याला ऑलरेडी नुकसान होते.

**शरद पाटील :-**

दुस-या बँकेत टाकून द्या, जिथे इंटरेस्ट जास्त आहे. आपली घट भरून निघेल.

**मा. सभापती :-**

एकदा तोडल्या की त्याची भरपाई मिळत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण जरा अकाउंटला विचारा की, आपल्याकडे जे लेटेस्ट बँक इंटरेस्ट आले आहेत ते किती आहेत?

**मा. सभापती :-**

दोन ठराव आले आहेत. या ठरावावर वोटींग करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, माझे असे म्हणणे आहे. आत्ता नउ टक्क्याने एफ.डी....

**मा.सभापती :-**

आत्ता नउ टक्के मिळतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ही एफ.डी. करुन ६.२५ टक्क्याचा मतलब काय?

**मा. सभापती :-**

आत्ता पैसे असतील तर एफ.डी. करायला, भरायला जाउ.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब आपल्याला तीन टक्के प्रॉफीट मिळतो. आपल्याला पाच लाखापेक्षा जास्त प्रॉफीट मिळणार आहे. हे नुकसान तुम्ही करता. आम्ही करत नाही.

**सुनिता पाटील :-**

तो नंतरचा विषय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही जर आत्ता तोडायला विनंती केली तर होणार.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पैसे कमी झाल्यानंतर इंटरेस्ट कसा मिळणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही सहा टक्क्याने एफ.डी. ठेवलेली आहे. सव्वा सहा टक्क्याने एफ.डी. ठेवलेली आहे, ८.३५ ने ठेवली, सात टक्क्याने एफ.डी. ठेवली. म्हणजे आपल्याला प्रत्येकामध्ये दोन ते तीन टक्क्याने इंटरेस्ट रेट कमी मिळतो. मग आपले किती नुकसान होते? याच्यापेक्षा आपले जास्त नुकसान होते. तुम्ही त्याचा विचार का करत नाही?

**मा. सभापती :-**

तो जुना रेट आहे. आत्ताचा नवीन रेट आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, जब जागो तब सवेरा. हे आत्ता आपल्या निदर्शनास आलेले आहे. मग आपण आत्ताच केले पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला सर्वांना एम.एम.आर.डी.ए. कडून जे पन्नास कोटी आपण घेतो. त्याच्या दोन ॲग्रीमेंटचा फॉरमॅट दिलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, मी मघाशी विषय काढलेला की, श्री. दिपक खांबित साहेबांना बोलवा.

**मा. सभापती :-**

श्री. दिपक खांबित साहेबांना अजूनपर्यंत अधिकार बहाल केलेले नाहीत. त्यामुळे आपण बोलवू शकत नाही.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६ करिता दोन ठराव आलेले आहेत. दोन्ही ठराव वाचलेले आहेत. दोन्ही ठराव वाचतो. पहिला ठराव सन्मा. सदस्या सौ. सुनिता पाटील यांनी मांडलेला आहे. (सुनिता पाटील यांचा ठराव टाकणे.) दुसरा ठराव, सुचक श्री. प्रशांत पालांडे आणि अनुमोदक श्री. टेरी परेरा (प्रशांत पालांडे यांचा ठराव टाकणे.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, याच्यामध्ये एक अशी उपसुचना घ्या की, मिरा भाईंदर महानगरपालिकेने ज्या पाणी पुरवठा राखीव निधीच्या ठेवी ठेवल्या आहेत. त्याचे बँक इंटरेस्ट खूप कमी असल्यामुळे आणि तसेच मिरा भाईंदर वासियांना लवकरात लवकर पाणी मिळणेकामी.

**नगरसचिव :-**

दुस-या ठरावावर दुरुस्ती आहे. दुसरा ठराव पहिल्यांदा मताला टाकतो. सुचक श्री. प्रशांत पालांडे आणि अनुमोदन श्री. टेरी परेरा यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**प्रकरण क्र. १६ :-**

एम.आय.डी.सी कडुन मंजुर ३५ एम.एल.डी पाणी पुरवठा कामी रु. २.५२ कोटी अनामत रक्कम भरणेसं व पाणी पुरवठा राखीव निधी ठेवावीत रक्कम मदतपुर्व काढणेस मंजुरी देणेबाबत.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस एम.आय.डी.सी. तर्फे ३५ एम.एल.डी. प्रतिदिन पाणी पुरवठा करणेकामी अनामत रक्कम दोन कोटी बावन्न लाख रुपये प्रदान करणेकरिता पाणी पुरवठा राखीव निधीमधून भरावयाची आहे. तरी वरीलप्रमाणे दोन कोटी बावन्न लाख रुपये अनामत भरण्यास मुदतपूर्व ठेवी वटविण्याचा ठराव मी मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत पालांडे** **अनुमोदक :- श्री. टेरी परेरा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. ओमप्रकाश अग्रवाल | १ | श्री. मॉरस रॉड्रिक्स | १ | निरंक |
| २ | श्री. शरद पाटील | २ | श्री. एस. ए. खान | २ | |
| ३ | श्री. प्रशांत पालांडे | ३ | श्री. तुळशीदास म्हात्रे | ३ | |
| ४ | श्री. टेरी परेरा | ४ | सौ. शानू गोहिल | ४ | |
| ५ | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | ५ | सौ. सुनिता पाटील | ५ | |
| ६ | श्री. राजू भोईर | ६ | सौ. नयना म्हात्रे | ६ | |
| ७ | श्री. ध्रुवकिशोर पाटील | ७ | श्री. गणेश शेट्टी, | ७ | |

**नगरसचिव :-**

सुचक श्रीम. सुनिता कै. पाटील आणि अनुमोदन श्री. एस. ए. खान यांचा ठराव मतदानास टाकत आहे. ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**प्रकरण क्र. १६ :-**

एम.आय.डी.सी कडुन मंजुर ३५ एम.एल.डी पाणी पुरवठा कामी रु. २.५२ कोटी अनामत रक्कम भरणेसं व पाणी पुरवठा राखीव निधी ठेवावीत रक्कम मदतपुर्व काढणेस मंजुरी देणेबाबत.

**ठराव :-**

एम.आय.डी.सी. कडील प्रति दिन ३५ एम.एल.डी. पाणी पुरवठा योजनेसाठी अनामत रक्कम रु. २.५२ कोटी (अक्षरी रुपये दोन कोटी बावन्न लाख मात्र) भरणा करणेंसाठी पाणी पुरवठा राखीव निधीतील एफ.डी. न तोडता जकातीचे हफ्ते आल्यावर व महापालिकेच्या जमा झालेल्या वसुलीद्वारे एम.आय.डी.सी. ला अनामत रक्कम भरणेत यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. सुनिता पाटील.** **अनुमोदन:- ॲड. एस. ए. खान.**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. मॉरस रॉड्रिक्स | १ | श्री. ओमप्रकाश अग्रवाल | १ | निरंक |
| २ | श्री. एस. ए. खान | २ | श्री. शरद पाटील | २ | |
| ३ | श्री. तुळशीदास म्हात्रे | ३ | श्री. प्रशांत पालांडे | ३ | |
| ४ | सौ. शानू गोहिल | ४ | श्री. टेरी परेरा | ४ | |
| ५ | सौ. सुनिता पाटील | ५ | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | ५ | |
| ६ | सौ. नयना म्हात्रे | ६ | श्री. राजू भोईर | ६ | |
| ७ | श्री. गणेश शेट्टी, | ७ | श्री. ध्रुवकिशोर पाटील | ७ | |

**नगरसचिव :-**

दोन्ही ठरावावर समसमान मतदान झाल्याने मा. पिठासिन अधिका-यांना एक मत असते. ते त्यांना यावेळी वापरता येईल. तरी मा. पिठासीन अधिका-यांनी योग्य वाटेल त्या ठरावाच्या बाजूने त्यांचे मत द्यावे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या सौ. सुनिता पाटील, यांच्या बाजूने माझे मत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही लोकांनी महापालिकेचे नुकसान केलेले आहे. तुमच्यापुढे मिरा भाईंदर वासियांना लेट पाणी मिळेल.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. बारकुंड साहेब हे जे ५० एम.एल.डी. पाणी येणार आहे. त्याचे रेट काय आहेत? पूर्वी होता तोच रेट राहणार का?

**शरद पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, तुम्ही माहिती द्या की, आत्ता येणाऱ्या पाण्याचा रेट काय आहे? आणि पूर्वी येतो त्याचा रेट काय?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रशांत पालांडे आणि श्री. टेरी परेरा यांच्या ठराव नामंजुर करण्यात येत आहे. सन्मा. सदस्य सौ. सुनिता पाटील यांच्या ठराव बहुमताने मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. बारकुंड साहेब, जरा माहिती द्या.

**शिवाजी बारकुंड :-**

एम.आय.डी.सी अन्य सर्व महापालिकांना ज्या दराने पाणी देते त्याच दराने आपल्याला देणार आहे. आणि सध्या एम.आय.डी.सी च्या प्रचलित दर आठ रुपये प्रति हजारी लिटर असा आहे.

**प्रशांत पालांडे :-**

ते कुठुन पाणी देणार आहेत?

**शिवाजी बारकुंड :-**

कापुरबावडी येथे त्यांची लाईन आलेली आहे. तिथे सर्व व्यवस्था करुन ठेवलेली आहे. रोडच्या एका बाजुला आपली स्टेमची एक लाईन आहे. आणि त्याला कनेक्शन करुन ठेवलेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

रेग्युलर पाईपलाइन मधुन पाणी येणार?

**शिवाजी बारकुंड :-**

पाणी पुरवठ्याची जास्त थकबाकी नाही आणि लोक भरतात आता मागच्या मा. स्थायी समितीमध्ये ठरल्यानुसार पाच तारखेपर्यंत बिले आणि नोटीस जातात. आणि सात तारखेपासुन त्याची वसुली जोरात चालु आहे.

**शानु गोहिल :-**

आता सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे यांनी सांगितले की, बिल्डरची थकबाकी जास्त होती आणि त्याला रिकनेक्शन केले. असे आपल्याकडे किती बिल्डर्स आहेत?

**शिवाजी बारकुंड :-**

असे नाहीच. मी मागच्या सभेमध्ये सांगितले की, पुर्वी असेसमेन्ट लागत होती. त्यांना आपण कनेक्शन देत होतो. परंतु, आत्ताच टॅक्स विभागाने सन्मा. आयुक्तांच्या आदेशानुसार ऑर्डर काढलेली की, १०० टक्के वसुली झाल्याशिवाय नळ कनेक्शन देण्यांत येउ नये. त्यानुसार त्याची अंमलबाजावणी होत आहे. आणि त्या केसमध्ये त्यांनी विचारले होते. त्याचे नळ कनेक्शन डिस्कनेक्ट केलेले आहे. आणि आपण टॅक्स विभागाला तसे लेखी कळवलेले आहे.

**सुनिता पाटील :-**

आत्तापर्यंत एवढी वसुली का झाली नाही?

**शिवाजी बारकुंड :-**

वसुली का झाली नाही याला मी कसा जबाबदारी टॅक्स डिपार्टमेंन्टच्या वसुलीला मी जबाबदार नाही.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, स्टॅन्ड पोस्ट किती चालु आहेत. आणि किती बंद आहेत याचे मला उत्तर द्या.

**शिवाजी बारकुंड :-**

मागच्या मा. स्थायी समितीच्या निर्देशानुसार सार्वजनीक स्टॅन्ड पोस्ट बंद करण्याची चालु करण्यांत आलेले आहे. सन्मा. सदस्या सौ. ज्योत्स्ना हसनाळे यांच्या वॉर्डमध्ये बंद केलेले सन्मा. सदस्या, सौ.नयना म्हात्रे यांच्या वॉर्ड मध्येपण बंद केलेले आहे.नवघर गावातले पण...

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुम्ही कधी बंद केले?

**शिवाजी बारकुंड :-**

ते कालपासुन बंद झालेले आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

बंद नाही. त्या ठिकाणी होते.

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्ही जे सांगितले होते की, पाणी फुकट जाते. ते झोनच आपण कालपासुन पुर्ण बंद केलेले आहेत. तिथुन पाणीच सोडत नाही. आणि सर्व शहरातील बंद कराची कार्यवाही चालु आहे.

**नयना म्हात्रे :-**

चालु आहे. पण ती कधीपासुन चालु केली आहे? म्हणजे कालपासुन चालु केली की, आजपासुन? गेल्या गुरुवारी तुम्ही मिटींगला विषय काढलेला तर शुक्रवारपासुन चालु झाली की, दोन दिवसांपासुन चालू आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

मिटींग झाली. त्याच्यानंतर सर्व सण वगैरे होते. त्याच्यामुळे राहिले होते.आत्ता दोन तीन दिवसांत आपण चालु केलेली आहे.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, आम्हाला पुढच्या मिटींगला असा रिझल्ट द्या की, मिरा भाईंदरचे सगळे स्टँन्ड पोस्ट काढले. आणि दुसरा विषय साहेब, माझ्या वॉर्ड मध्ये देखिल पाणी व्यवस्थित येते. कधीतरी हफ्त्याला एकदा येत नाही. त्याच्याबद्दल आमचा वाद नाही. पण नळाला चावीच नाही. मग पाणी भरले की,चावी नाही म्हणुन पाणी वाहत जाते. तर तुमच्या मेस्त्री लोकांना असे सांगा की जे नळ चालु आहेत. प्रत्येकाला घरी जावुन असे सांगा की, त्याला कमीत कमी चावी तरी लावा. कारण आमच्यासारखे नगरसेवक सांगायला गेले की, त्यांच्या मनामध्ये काहीतरी वेगळेच येते. तुमच्या नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले तर गोष्ट वेगळी आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण सर्वांना लेखी अहवाल करणार आहोत. त्या उपरही तसे नळ चालु राहिले तर ते नळ कनेक्शन खंडीत करण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, तुमचे जे व्हॉल्हमॅन आहेत. त्यांना इंन्स्ट्रक्शन द्या की, पाणी सोडल्यानंतर त्या प्रभागात फिरा. ते व्हॉल्व्हमॅन फिरत नाहीत. तुम्ही त्यांच्याकडुन रिपोर्ट घ्या.

**मा. सभापती :-**

जिथे स्टॅण्ड पोस्ट असतील ते सर्व स्टॅण्डपोस्ट बंद करावेत. आणि त्या एरियामध्ये चौकशी करुन किती आदिवासी आणि किती गरीब मनुष्य आहेत. तिकडे ग्रुप कनेक्शन सुरु करुन द्यावे. आणि त्याचे बिल वसुल करण्यांत येईल.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

शासनाच्या सुध्दा स्पष्ट सुचना आहेत की, मोफत पाणी द्याचचे नाही सार्वजनिक वापर होत असेल तर त्याचे ग्रुप कनेक्शन करावे.

**नयना म्हात्रे :-**

पण ते ग्रुप कनेक्शन घेण्यासाठी लोक तयार आहेत का? नाहीतर आपण नुसते ग्रुप कनेक्शन म्हणजे कसे समजा स्टॅन्ड पोस्ट आहे ती एकची लाईन असेते. आपण ग्रुप कनेक्शन दिले तर अर्धाची लाईन असते. परत बाकीच्या लोकांना त्याचा फरक पडतो ते जरा व्यवस्थित करण्यांत यावे. साहेब, पुढे एकची लाईन आणि मागे गेला तो अर्धाचा आहे. मग त्याला पाणीच येत नाही. असे माझ्या वॉर्डमध्ये चालले आहे.

**मा. सभापती :-**

आत्तासुध्दा स्टॅण्डपोस्टवर पाणी वेस्ट जाते त्याला हेच कारण आहे.

**नयना म्हात्रे :-**

स्टॅण्डपोस्टवर पाणी वेस्ट जात नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मॅडम, तुमच्या इकडे जर टेक्नीकल अडचण असेल तर इंजिनियर सोबत मी स्वतः येतो. आपण त्याच्यावर काय करता येईल ते विझीट करुन बघु या.

**प्रकरण क्र. १६ :-**

एम.आय.डी.सी कडुन मंजुर ३५ एम.एल.डी पाणी पुरवठा कामी रु. २.५२ कोटी अनामत रक्कम भरणेसं व पाणी पुरवठा राखीव निधी ठेवावीत रक्कम मदतपुर्व काढणेस मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ०९ :-**

एम.आय.डी.सी. कडील प्रति दिन ३५ एम.एल.डी. पाणी पुरवठा योजनेसाठी अनामत रक्कम रु. २.५२ कोटी (अक्षरी रुपये दोन कोटी बावन्न लाख मात्र) भरणा करणेंसाठी पाणी पुरवठा राखीव निधीतील एफ.डी. न तोडता जकातीचे हफ्ते आल्यावर व महापालिकेच्या जमा झालेल्या वसुलीद्वारे एम.आय.डी.सी. ला अनामत रक्कम भरणेत यावा असा मी ठराव मांडत आहे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. मॉरस रॉड्रिक्स | १ | श्री. ओमप्रकाश अग्रवाल | १ | निरंक |
| २ | श्री. एस. ए. खान | २ | श्री. शरद पाटील | २ | |
| ३ | श्री. तुळशीदास म्हात्रे | ३ | श्री. प्रशांत पालांडे | ३ | |
| ४ | सौ. शानू गोहिल | ४ | श्री. टेरी परेरा | ४ | |
| ५ | सौ. सुनिता पाटील | ५ | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | ५ | |
| ६ | सौ. नयना म्हात्रे | ६ | श्री. राजू भोईर | ६ | |
| ७ | श्री. गणेश शेट्टी, | ७ | श्री. ध्रुवकिशोर पाटील | ७ | |
| | कास्टींग वोट | | | | |
| ८ | श्री. मॉरस रॉड्रीक्स | | | | |

**सुचक :- श्रीम. सुनिता पाटील.** **अनुमोदन:- ॲड. एस. ए. खान.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७, दुहेरी नोंद लेखा पध्दती निविदा मंजुरी बाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. एस.ए.खान साहेब, सन्मा. सदस्य श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब, मा. महासभेमध्ये सांगता की, पहिल्यांदा चर्चा करा. आणि मग तुम्ही ठराव मांडा मग याच्यावर चर्चा करु द्या. तुम्ही ठराव कसा मांडता? हे होउ शकणार नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

हा ठराव पहिल्यांदा वाचुन घेउ द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अजिबात नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ठराव नंतर होतो. पहिल्यांदा चर्चा होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पहिली गोष्ट हा खुलासा करा की, लुक्कड आणि संघानिया या दोघांना द्यायचे आहे की, कोणाला द्यायचे? हे तुम्ही क्लीअर करा. इकडे लुक्कडचे टेंडर लोवेस्ट नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गेल्या वेळी सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी सांगितले होते की, बाजाराच्या टेंडरमध्ये जे श्री. अतुल ठाकुर आहेत ते सगळ्यात जास्त वसुली आपल्याला करुन देणार आहे. तेव्हा प्रशासनाचे म्हणणे होते. की, असे होउ शकत नाही. मग आता हे कसे झाले?

**मा. सभापती :-**

आपला स्थानिक असल्यामुळे देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्थानिकचा प्रश्न नाही.

**मा. सभापती :-**

आपण उल्हासनगरला तातडीने भेटायला जाउ शकतो का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परत रिटेंडरींग करा. टेंडर रिकॉल करा. आणि त्यांना सांगा की, तुम्ही बिलोमध्ये द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टेंडर रिकॉल करा. लुक्कडचे बिलो येईल. लुक्कडला आपण दोन वेळा दिलेला आहे. पहिल्यांदा त्यांचे ७६ लाखाचे आले होते. त्याने त्यावेळी वाटाघाटीमध्ये केले नाही. तुम्ही ठराव मांडताना विचार करा. सन्मा. सदस्य, श्री. एस.ए.खान साहब, आप वकील है। आप अभी बात किजिए। इधर प्रिन्सीपलकी बात करो। महापालिका के हित की, बात करो आप कैसा ठराव मांडते हो।

**एस. ए. खान :-**

हित का बात है।

**शरद पाटील :-**

यह हित का बात है क्या?

**एस. ए. खान :-**

आपको हित का लगता है?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अभी प्रशासन ऐसा बोल रहा है। आपने ठराव मांडा, अनुमोदन दिया इसलिए हम आपको बोल रहे है। आप इनके गट के नेता है। सन्मा. सदस्य श्री. एस.ए.खान साहब, आप काँग्रेस के गट के नेता है इसलिए हम आपको बोल रहे है। आप सिनिअर है। आप इनको समझाओ की, प्रशासन ने टिप्पणी दिया की, अग्रवाल संघारिया को देना है। वह लोएस्ट है। प्रशासन का काम है, जो लोएस्ट टेंडर है..

**मा. सभापती :-**

उसमे जो अमाउंट दिया है वही है। जो बडा आमउंन्ट.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ऐसा नही कर सकते।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हमने बाजार का ज्यादा का दिया है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. श्री. खतगांवकर साहेब तुम्ही असे करु शकता का? कारण तुमची टिपण्ी आहे आणि या लोकांनी असा ठराव मांडला. तुम्हीच सांगा हा ठराव बरोबर आहे की चुकीचा आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आयुक्तांनी या प्रकरणामध्ये दोन वेळेस निविदा काढलेल्या आहेत. पहिल्या वेळेस निविदा काढल्या त्यावेळेस तीन ठेकेदार आले होते आणि त्यामध्ये सर्वात कमी निविदा श्री. आर. डी. लुक्कड यांची होती आणि ते दर जास्त्ीचे होते म्णून पुनःश्च निविदा काढण्यात आल्या नंतर चार निविदा प्राप्त झाल्या आणि या चार निविदांमध्ये अग्रवाल संघारीया ॲन्ड कंपनी यांच्या निविदा सर्वात कमी दराच्या आहेत आणि त्या कमी दराच्या निविदा मंजुरीसाठी मा. आयुक्तांनी मा. स्थायी समितीला शिफारस केली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आत्ता ह्या लोकांनी श्री. लुक्कड साहेबांच्या कंपनीसाठी ठराव कसा मांडला? आणि गेल्या वेळी या लोकांनी बाजारामध्ये तीन टेंडर काढले हाते. त्यावेळी फक्त दोनच वेळा टेंडर का काढले? तिसऱ्या वेळेला का काढले नाही? मा. सभापती साहेब, तुमची इच्छा आहे की, श्री. लुक्कड साहेबांना टेंडर द्यायचे. मग तुम्ही टेंडर रिकॉल करा. आमची सुद्धा इच्छा आहे की, इकडच्या स्थानिक माणसाला द्यायला पाहिजे. जो अनुभवी आहे त्यांना द्यायला पाहिजे. परंतु, त्यांनी व्यवस्थित मार्गाने द्यायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

त्याला रिकॉल करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, भाईंदरमध्ये सी.ए.ची इन्स्टीट्युट आहेत. तीनशे सी.ए. आहेत. त्यांना कोणाला हे माहितीच नाही आणि सर्वात महत्वाची गोष्ट आपण सी.ए. मागवतो आणि वर्तमानपत्रामध्ये न्युज काढतो, महाराष्ट्र टाईम्स आणि मुंबई सकाळला विरोध नाही. जेव्हा एका तज्ञाची आपण गोष्ट करतो. चार्टर्ड अकाउंटन्ट हे इकॉनॉमिक टाईम्स, टाईम्स ऑफ इंडीया अशी वर्तमान पत्र घेतात आणि महाराष्ट्र टाईम्स व मुंबई सकाळ या वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात काढता. हे बरोबर आहे का? म्हणजे शेवटी प्रशासन आम्हाला काय दाखवायचा प्रयत्न करते? पारदर्शकता दाखवायचा प्रयत्न करतो.

**मा. सभापती :-**

तुमच्या म्हणण्याप्रामाणे तुम्ही सांगणार त्या पेपरला दिले पाहिजे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही म्हणत नाही. जेव्हा आपण सी.ए. नेमतो. सी.ए. हे टाईम्स ऑफ इंडीया, इकॉनॉमिक्स टाईम्स असे इंग्लिश पेपर आहेत. ज्यांना मराठी कळतसुद्धा नसेल. काही लोकांना हिंदी कळत नसेल अशा वेळी एका इंग्लिश पेपरमध्ये जाहिरात आली पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सी. ए. ला सर्व भाषा येत असतात.

**मा. सभापती :-**

दुहेरी नोंद लेखा पद्धती निविदा रिकॉल करण्यासाठी पुन्हा मागवा.

**प्रकरण क्र. १७ :-**

दुहेरी नोंद लेखा पद्धती निविदा मंजुरीबाबत.

(सदरचा विषय मा. सभापती सोा. यांच्या आदेशावरून नामंजुर करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १८, वार्षिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**एस. ए. खान :-**

सन २००-०७- चा वार्षिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करणेंत आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००६-०७ च्या वार्षिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आमची याच्यावर एक सुचना आहे. ती सुचना आपण त्याच्यात घ्यावी. प्रकरण क्र. १८ सन २००६-०७ च्या मंजुर अंदाजपत्रकानुसार सन २००६-०७ ची वार्षिक अंदाजपत्रकिय तरतुद व त्यानुसार झालेली जमा व त्याचप्रमाणे झालेल्या खर्चास शासकिय ऑडीट रिपोर्ट आल्यावर ज्या ज्या खर्चावर ऑडीट आक्षेप असेल ते जबाबदार राहतील ही अट धरून आम्ही या वार्षिक जमाखर्चास मंजुरी देत आहोत.

**मा. सभापती :-**

ऑडीटर जबाबदार असतो. त्यात प्रश्नच नाही.

**शरद पाटील :-**

आमची ही सुचना त्या ठरावामध्ये घ्या. या तिन्ही ठरावांमध्ये या सुचना घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १९, त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणे. प्रकरण क्र. २० त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणे.

**एस. ए. खान :-**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल २००७ ते जून २००७ चे त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करणेंत आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल २००७ ते जून २००७ च्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**शरद पाटील :-**

या ठरावामध्ये सुद्धा मी वाचलेली त्याप्रमाणे सुचना ॲड करून घ्यावी.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**एस. ए. खान :-**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील माहे जूलै २००७ ते सप्टेंबर २००७ चे त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करणेंत आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील माहे जुलै २००७ ते सप्टेंबर २००७ च्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान साहब, उसमे ॲड करो की, सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील इन्होने रखी हुई सुचना ॲड करके वो ठराव मंजुर किया जाता है।

**मा. सभापती :-**

सुचनेसह प्रकरण क्र. १८,१९, व २० चे ठराव मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. १८ :-**

वार्षिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. १० :-**

सन २००६-०७ चा वार्षिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करणेंत आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००६-०७ च्या वार्षिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुचक :- ॲड. एस. ए. खान.** **अनुमोदनः- सौ. सुनिता कै. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १९ :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणे. प्रकरण क्र. २० त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणे.

**ठराव क्र. ११ :-**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल २००७ ते जून २००७ चे त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करणेंत आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल २००७ ते जून २००७ च्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुचकः- ॲड. एस. ए. खान** **अनुमोदकः- सौ. सुनिता कै. पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. २० :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत (माहे जुलै २००७ ते सप्टेंबर २००७)

**ठराव क्र. १२ :-**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील माहे जूलै २००७ ते सप्टेंबर २००७ चे त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करणेंत आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील माहे जुलै २००७ ते सप्टेंबर २००७ च्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुचक :- ॲड. एस. ए. खान** **अनुमोदन :- सौ. सुनिता कै. पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१, केरळ राज्यात कोची महानगरपालिकेस शैक्षणिक भेट देण्याबाबत.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, हे जे कोचीला जाणार त्यांना पाठवू नका. कारण थोड्याच दिवसामध्ये नविन बॉडी येत आहे. ती तिथुन शिकुन येउन काय करणार?

**प्रशांत पालांडे :-**

सभा नियमानुसार बरोबर आहे का?

**नगरसचिव :-**

आत्ता प्रस्ताव गेलेला आहे. ह्या महिन्यात लागू शकेल.

**नयना म्हात्रे :-**

तो रद्द करा मला एक उत्तर द्या. बॉडी एका वर्षाची असते त्यांच्या बॉडीला किती महिने झाले?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

किती महिने झाले?

**नयना म्हात्रे :-**

अजुन किती दिवस ती बॉडी आहे ही पण माहिती द्या.

**नगरसचिव :-**

तीन महिने आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तीन महिन्यामध्ये ती शिकुन येउन काय करणार?

**नयना म्हात्रे :-**

माझे म्हणणे आहे की, जी नविन बॉडी येईल त्यांना तिकडे पाठवा. तीन लाख उडवायचे म्हणजे खाउ आहे का? आपण बचत साठी एकमेकांशी किती भांडतो.

**मा. सभापती :-**

सध्या आपल्याकडे पैशांचा तुटवडा असल्या कारणाने जी नवीन बॉडी येईल त्यांना आपण प्रशिक्षणाला पाठवू या. ठराव मांडत नाही, रद्द करतो.

**प्रकरण क्र. २१ :-**

केरळ राज्यात कोची महानगरपालिकेस शैक्षणिक भेट देण्याबाबत.

(सदरचा विषय मा. सभापती सोा. यांच्या आदेशान्वये नामंजुर करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २२ पुर्नविनियोजन करणेबाबत.

**एस. ए. खान :-**

पल्स पोलिओ प्रचार व प्रसार या शिर्षासाठी २००७-०८ या अर्थसंकल्पिय वर्षाकरिता सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार पूर्वविनीयोजन करण्यास मा. स्थायी समिती मंजूरी देत आहे.

**शानु गोहिल :-**

माझे अनुमोदन आहे.

**नयना म्हात्रे :-**

मला या विषयावर बोलायचे आहे. आत्ता पोलिओ वाल्यांचे ६ कार्यक्रम झाले. त्यांना आपण ४५ लाख रूपये दिलेले आणि आत्ता चार महिने बाकी राहिले तर त्यांना २० लाख रूपये पाहिजे. तर साहेब, महिन्याचा खर्च किती झाला? पाच लाख रूपये म्हणजे साहेब, महिन्याचा खर्च जर पाच लाख रूपये आहे आणि त्यांनी सहा महिन्यामध्ये ४५ लाख रूपये जर संपवले तर महिन्याला पाचच लाख रूपये खर्च आहे. त्यांचेच म्हणणे आहे की, आम्हाला २० लाख रूपये द्या. मग १५ लाख रूपये कुठे गेले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, हा खर्च महिन्यावाईज नसतो. पल्स पोलिओच्या जशा फेऱ्या होतात. त्या फेरीवाईज खर्च होतो.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, आपण ज्या माणसाला ठेका देतो तो काय दिवे लावतो बघा. माझ्याकडे त्याचे फोटो आहेत. तो फक्त तारीख बदलतो. बाकी काही करत नाही. तो कलर वगैरे काही करत नाही. मा. महापौर कोण, मा. उपमहापौर कोण हे त्या ठेकेदाराला माहिती नाही. तो फक्त तारीख आणि महिना बदलतो. बाकी मा. महापौरांचे नाव बदलत नाही. मा. उपमहापौरांचे नाव बदलत नाही. मग आपण एवढे पैसे कशाला घालवतो? आत्ताच त्यांनी म्हटले आहे की, आम्हाला चार महिन्यासाठी २० लाख रूपये खर्च आहे. ठिक आहे, मला मान्य आहे. मग आपण त्यांना सहा महिन्याचे ४५ लाख रूपये दिलेले. महिन्याचा पाच लाख खर्च आहे. मग ३० लाख रूपये झाले. १५ लाख रूपये कुठे गेले.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, त्यांचा प्रश्न आहे. त्या संदर्भातच माझा एक प्रश्न आहे. आपण जे मंडप करता त्या मंडपाचा ठेका आपण वर्षभरचा दिलेला असतो. तो कोणाला दिलेला आहे?

**नयना म्हात्रे :-**

तो ठेकेदार कोण आहे?

**सुनिता पाटील :-**

ते मंडप पण बांधत नाही.

**शरद पाटील :-**

मंडपाचा ठेका कोणाला दिलेला आहे? आणि त्या मंडपाच्या वर्षभराच्या ठेकेमध्ये आपण कोणकोणते मंडप बांधतो? याची मला सविस्तर माहिती द्यावी.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, आपल्याकडे शाळा आहेत, समाजमंदिर आहेत, सगळे आहे. मग ते दोन ताडपत्र्या बांधतात. त्यांचे मंडप तयार झाले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण हा प्रोग्राम झाल्यानंतर प्रत्येकाच्या घरोघरी आपली माणसे पाठवतो. मग आपल्याला ते मंडप लावायची गरज काय?

**नयना म्हात्रे :-**

आपल्या शाळा आहेत. प्रत्येकाच्या वॉर्डमध्ये शाळा आहेत.

**शरद पाटील :-**

शाळा तर आहेतच. ते मंडप न टाकता कोणाच्याही ऑफिसमध्ये सुद्धा बसतात. ते माझ्या ऑफिसमध्ये ते बसतात आणि त्याच्यापुढे मंडप नसते.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हा फक्त मंडपाचा खर्च नाही. मानधनाचा जास्त खर्च होतो. तो त्याच्या प्रोग्राममध्ये आहे.

**शरद पाटील :-**

मानधनाचा आणि मंडपाचा खर्च असेल ना?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मंडपाचा खर्च किरकोळ आहे.

**शरद पाटील :-**

किरकोळ असू द्या.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तो शासनाचा कार्यक्रम आहे.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, आमचा या शासनाच्या कार्यक्रमाला विरोध नाही. आम्ही विरोध करणारसुद्धा नाही. आत्ता तुम्हाला २० लाख पाहिजे. पूर्वी ४५ लाख संपले मग याच्यामध्ये तुमचीच कुठेतरी गडबड आहे ना? ती पहिल्यांदा क्लीअर करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने खुलासा करतो. या आर्थिक वर्षामध्ये आत्तापर्यंत आपल्या शहरामध्ये पल्स पोलिओच्या सहा फेऱ्या झालेल्या आहेत. त्यावर तो खर्च झालेला आहे. आणि पुढे अपेक्षित चार फेऱ्या होण्याची शक्यता आहे. एका फेरीमध्ये आपण साधारणतः ९६५ लोकांना काम देतो. शाळेतील विद्यार्थी, एन.एस.एस. चे विद्यार्थी आहेत. त्यांना एका विद्यार्थ्याला आपण पंचाहत्तर रूपये मानधन देतो. त्याच्यात हा खर्च सर्वात जास्त आहे आणि आपण ८७ मंडप घालतो. ते मंडप कमी करा. जर शाळा, कोणाचे दवाखाने घेतात तर ते कमी करू शकता. दुसरा मुद्दा आहे, जे छपाई करतात. ते बॅनर तुम्ही जपून ठेवायला पाहिजे. मॅडम, बोलल्याप्रमाणे फक्त डेट आणि मी तुम्हाला त्या सुचना दिलेल्या होत्या. परत रिप्रिंट करायची गरज नाही. पोलिओचे वार्षिक बॅनर लावायचे. फक्त डेट बदलत राहायची.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही बॅनरचे बोलता. पण मी या भिंतींना रंगवलेले बोलते. सौ. निर्मला सावळे महापौर आहेत का? तुम्ही ठेकेदाराला ते देखील काम देता. श्री. चंद्रकांत वैती अजून उपमहापौर आहेत का? ठेकेदार तुम्हाला चुना लावतो. तुम्ही हे विषय आणू नका.

**शरद पाटील :-**

साहेब, काल फोटो काढले आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मंडपाचा खर्च आहे. छपाई मटेरियलचा खर्च आहे. विद्यार्थ्यांना देणारे मानधन या बाबींवर खर्च केला जातो.

**शरद पाटील :-**

मंडपाचे अजुन क्लेरिफिकेशन झालेले नाही. मंडपाचे आपण वर्षाचे कॉन्ट्रॅक्ट देतो. नवरात्री, गणपती या सगळ्यांना देतो. त्याच्यात हे कॉन्ट्रक्ट आहे का?

**डॉ. लहाने :-**

मंडप, भिंतीवर पेंटींग वगैरे जे आहेत ते आम्ही स्वतः ठेकेदार लावून करत नाही. भांडार विभागाला ते सगळे दिलेले आहे. आणि त्याच्यामधून आम्ही हे सगळे करून घेतो.

**शरद पाटील :-**

भांडार विभागाने त्याची माहिती द्यावी.

**नयना म्हात्रे :-**

भांडार विभाग आपल्या आस्थापनेमध्ये येत नाही का?

**डॉ. लहाने :-**

येतो. खर्च आमच्याच हेडमध्ये येतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांचे म्हणणे असे आहे की, आपण वार्षिक ठेका दिला. त्यामध्ये हे मंडप समाविष्ठ आहे की नाही? याचे तुम्ही वेगळे देता की, त्याच्यामध्ये समाविष्ठ आहे.

**डॉ. लहाने :-**

पल्स पोलिओचे फक्त पल्स पोलिओसाठी आहे. बाकी वेगळे असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्या तेच विचारतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सहा फे-या होणार आहेत. त्याच्यासाठी लागणारा हा खर्च आहे. सहा फे-यांमध्ये साधारणपणे हजार लोक काम करतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, आपली मेहनत डबल होते. तुम्ही एकदा मंडप लावता. त्याच्यानंतर आपले जे कर्मचारी आहेत, त्यांना प्रत्येकाच्या घरी पाठवता. म्हणजे तो घरी जातो आणि विचारतो की, तुमच्या घरात लहान मुलगा आहे का? नसेल तर तो लगेच बाजुच्या घरात जातो. मग आपल्याला मंडपाचा खर्च करायची गरज काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, मी तुम्हाला माहिती देतो. डॉक्टर सुद्धा माहिती देतील. पल्स पोलिओचे इंटरनॅशनल कॉन्सेप्ट आहे. युनोकडून सुचना आहेत की, आपण जसा देवीचा रोग इरॅडीकेट केलेला आहे. समाजातून काढून टाकलेला आहे किंवा कुठेच नाही. तसे पल्स पोलिओचे सुद्धा आपले टारगेट आहे आणि त्या पद्धतीने कामकाज करण्यासाठी एकही सस्पेस्टीबल आपल्याला मिळाला तर त्याच्या विष्ठेमध्ये किंवा ते जे जंतू जिवंत असतात ते दुस-याला कॉन्टॅक्ट होउ शकतात. हे वायबल व्हायरस जिवंत ठेवायचा नाही असा युनिव्हर्सल कन्सेप्ट आहे. आणि त्याच्यासाठी लोकांच्या मदतीसाठी लोकांच्या मानसिकतेसाठी, काही लोकांच्या अडचणी असतात, कोणी ट्रान्झीस्टमध्ये असतात, कोणी प्रवासात असतात. तर त्यांना आयडेन्टीफाय करण्यासाठी झिरो ते पाच वयोगटातील जो लाभार्थी आहे त्यातील एकसुद्धा आपल्याला सोडता येणार नाही. असे निर्देश आहेत. म्हणून आपण त्याच्यात हाउस टू हाउस जातो. ह्या कामाच्या पद्धती आहेत. ते करणे अपेक्षित आहे.

**शरद पाटील :-**

ते असायलाच पाहिजे. पण माझी एवढीच विनंती आहे की, जे मंडप आपण बांधतो ते मंडप बांधलेले आहेत की, नाही? पैसे किती जातात त्याचा विषय नाही.

**नयना म्हात्रे :-**

हा पैशाचा विषय आहे. कारण आपल्याला ते पैसे द्यायचे आहेत. लोक टॅक्स भरतात. टॅक्स भरत नाही तर घरे लॉक करतात.

**शरद पाटील :-**

त्या मंडपाला किती खर्च जातो ते बोलण्याचा अर्थ नाही. तो मंडप तिथे बांधला नसेल तर त्याचे पैसे नाही लागले पाहिजे. हे आमचे म्हणणे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या सुचना निश्चितच शहनिशा करून त्याची कार्यवाही केली जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, ही जी टिप्पणी दिलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्हाला आत्ता किती रक्कम अपेक्षित आहे?

**डॉ. लहाने :-**

२० लाखापर्यंत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आणि किती फे-या होणार आहेत?

**डॉ. लहाने :-**

चार.

**नयना म्हात्रे :-**

मग सहा फे-यामध्ये तुम्हाला ४५ लाख रूपये जास्त वाटले नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी तुम्हाला त्या मुद्यावर आणून देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही टिपणी देताना पाच लाखाचे बोलता. टिप्पणी देताना ७ ते ८ लाख लिहिले आहेत. म्हणजे एका लाखाचा डिफरेन्स अधिका-यांच्या टिपणीमध्येच आहे.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, अंदाजे आहे. एक्झॅक्ट आपल्याला कसे सांगता येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही सहा फे-या केलेल्या आहेत. सहा फे-यांमध्ये तुम्हाला एव्हरेज खर्च माहिती पडलेला आहे. त्याच्यामध्य दहा वीस हजाराचा फरक घेउ शकतो. सात आणि आठ. एक लाखाचा डिफरेन्सची तुम्ही टिपणी देता आणि सांगता चर्चा करू नका. तुम्ही एकातरी पल्स पोलिओचा खर्च आम्हाला दिला का? की, या पल्स पोलिओचा मॅक्झीमम खर्च सहा लाखाचा झाला. तुम्ही मॅक्झीममचा खर्च दिला असता.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, यांनी ४५ लाख रूपये कुठे कुठे संपवले आहेत त्याचा आम्हाला व्यवस्थित खुलासा द्या आणि हा विषय पुढच्या मिटींगला घेतला तरी चालेल.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

चार तारखेला परत राउन्ड आहे.

**राजकुमार कांबळे :-**

मॅडम, सहा तारखेला परत राउन्ड आहे.

**नयना म्हात्रे :-**

आत्ता २० लाख आणि पहिले ४५ लाख आत्ता २० लाखप्रमाणे त्यांचे ३० लाख रूपयेच संपायला पाहिजे होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ही पद्धत नाही.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याचा खर्च तुम्हाला देउ.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

त्याचा खर्च तुम्ही आम्हाला डिटेलमध्ये द्या. आम्ही विषयाला मंजुरी देतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. पानपट्टे साहेब, सन्मा. सदस्यांचे म्हणणे असे आहे की, ते हा विषय मंजुर करतील. पुर्ण डिटेल खर्च तुम्ही द्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पुर्ण डिटेल खर्च द्या. आम्ही विषय मंजुर करतो.

**नयना म्हात्रे :-**

आमचे समाधान होउ द्या. आम्हाला काही कमी जास्त वाटले तर ते आम्हाला चालणार नाही. कारण आता मंजुरी दिली तर परत दुसऱ्या दिवशी आम्हाला तुम्ही जो हिशोब दिला. त्यामध्ये घोटाळा केला तर चालणार नाही. आत्ता विस आणि पहिले संपलेले ४५ याच्यामध्ये खुप फरक दिसतो.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तुम्हाला डिटेल देउ.

**मा. सभापती :-**

हा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, टिप्पणी देताना अंदाजे रक्कमेमध्ये १०-१५ हजाराचा फरक होउ शकतो. लाखाचा फरक होउ शकत नाही.

**एस. ए. खान :-**

श्री. पानपट्टे साहेब, आता सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे यांनी सांगितले तसे व्हायला नाही पाहिजे.

**मा. सभापती :-**

ते बजेटमध्ये येतील तेव्हा टिप्पणीसहित देतील.

**नयना म्हात्रे :-**

साहेब आता आपले नविन बजेट येईल. त्यावेळेला या लोकांनीच इकडे दिले आहे की, महिन्याचा खर्च पाच लाख रूपये. दहा महिन्याचे पैसे मोजून तेवढेच बजेट करून ठेवा. नाहीतर पहिले पंचेचाळीस आणि नंतर सगळा घोटाळा होत जातो.

**प्रकरण क्र. २२ :-**

**पुर्नविनियोजन करणेबाबत.**

**ठराव क्र. १३ :-**

पल्स पोलिओ प्रचार व प्रसार या शिर्षासाठी २००७-०८ या अर्थसंकल्पिय वर्षाकरिता सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार पूर्वविनीयोजन करण्यास मा. स्थायी समिती मंजूरी देत आहे.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**नमुना क्र. १० (आरोग्य विभाग)**
**नियम ३० (३) पहा**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मूळ तरतुद | ऑक्टोंबर अखेर २००७ पर्यंत झालेला खर्च | होणारा अंदाजीत खर्च (माहे मार्च २००८ पर्यंत) | उपलब्ध शिल्लक | लेखाशिर्ष | मूळ तरतुद | ऑक्टोंबर २००७ अखेर पर्यंत झालेला खर्च | होणारा अंदाजीत खर्च (माहे मार्च २००७) | प्रस्तावीत वाढीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १. | कुटूंब नियोजन प्रचार व प्रसार | ५,००,०००/- | - | - | ५,००,०००/- | पल्स पोलिओ लसीकरण मोहिम प्रचार व मानधन | ४५,००,०००/- | ४४,९१,६३७/- | १९,८४,३३७/- | १९,७६,०००/- |
| २. | लस टोचणी (अकस्मित खर्च) | ५,००,०००/- | २४,०००/- | - | ४,७६,०००/- | | | | | |
| ३. | औषध खरेदी | १,२०,००,०००/- | २०,००,०००/- | ९०,००,०००/- | १०,००,०००/- | | | | | |
| | एकूण | १,३०,००,०००/- | २०,२४,०००/- | - | १९,७६,०००/- | एकूण | ४५,००,०००/- | ४४,९१,६३७/- | १९,८४,३३७/- | १९,७६,०००/- |

शेरा-सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात कुटुंब कल्याण प्रचार व प्रसार, लस टोचणी (अकस्मित खर्च), औषध खरेदी या शीर्षाखाली असलेल्या तरतुदीतूप झालेला खर्च व माहे मार्च २००८ पर्यंत होणारा अंदाजित खर्च गृहीत धरला असता उर्वरित रक्कम रु. १९,७६,०००/- पल्स पोलिओ लसीकरण मोहिम प्रचार व मानधन ा या शिर्षासाठी वर्ग करणेस शिफारस असे.

**सुचकः- ॲड. एस. ए. खान** **अनुमोदकः- सौ. शानू जो. गोहिल**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महागनरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २३, मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण कडून डी.पी. रस्ता, भुयारी गटार योजनेसाठी मंजुर केलेल्या कर्ज प्रस्तावातील अटीशर्तीस मंजुरीबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यामध्ये सविस्तर माहिती मराठीमध्ये द्या.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. बारकुंड साहेब, हे जे ५० कोटी खर्चास मंजुरी दिलेली आहे हे रस्ते जे.एन.आर.यु.एम मध्ये आहेत का?

**शिवाजी बारकुंड :-**

हे रस्ते जे.एन.आर.यु.एम मध्ये नाहीत. हे डी.पी रस्ते लोनमधुन करण्याचा प्रस्तावांना मा. महासभेने मंजुरी दिलेल्या आहेत.

**शरद पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, मा. महासभेमध्ये ज्यावेळेस असे विषय आले त्यावेळेला तरतुद नाही म्हणुन आपण सांगितले होते.

**शिवाजी बारकुंड :-**

हे विषय वर्ष - दिड वर्षापुर्वी मा. महासभेत मंजुर झालेले आहेत.

**शरद पाटील :-**

याच्यामध्ये आत्ता तरतुद आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

लोनमधुन करण्यासाठीच मान्यता झालेली आहे आणि एम.एम.आर.डी.ए कडुन आपण लोन घेतो. लोनसाठी ज्या अटीशर्ती असतात त्या मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी आहेत. एम.एम.आर.डी.ए ही खाजगी संस्था नाही ही शासनाचीच संस्था आहे. आणि आपण त्यांच्याकडुन लोन घेतो.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. खतगांवकर साहेब, आपल्या बजेटमध्ये कर्ज परतफेडीसाठी आपण सहा कोटी की बारा कोटीचे या वर्षी ठेवलेले आहेत. ते जरा आम्हाला सांगा.

**शरद बेलवटे :-**

बारा कोटी.

**प्रशांत पालांडे :-**

वर्षाला बारा कोटी ना? त्याच्यानंतर आपल्याला जे.एम.आर.यु.एम साठी पुढच्या तेवीस वर्षामध्ये एक हजार कोटीची तरतुद करायची आहे. म्हणजे वर्षाला साधारणपणे ४५ कोटी होतात. ते आपल्याला पुढच्या वर्षीपासुनच सुरु करावे लागेल. त्याचे प्रोव्हीजन कसे असते?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु) साो.) :-**

आपण बारा कोटी ही जी रक्कम ठेवलेली आहे ती टोकन हेड म्हणुन ठेवलेली आहे. भविष्यात जे लोन मंजुर होतील किंवा.....

**प्रशांत पालांडे :-**

आपण आत्ता जे लोन घेतलेले आहे. त्याची परतफेड आपण वर्षाला किती करतो?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

या प्रस्तावामध्ये कोणकोणते रस्ते करायचे ती माहिती आपल्याला पाहिजे की नाही?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु) साो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रशांत पालांडे साहेब, आपल्याकडे आत्ता सध्या तीन विषयांच्या लोन लायबिलिटीज आहेत. आणि त्याची ती तरतुद बारा कोटी आहे. आत्ता हे जे ५० कोटी करणार आहोत त्याची आज जर मान्यता झाली तर येणाऱ्या बजेटमध्ये त्याची तरतुद केली जाईल.

**प्रशांत पालांडे :-**

माझा विषय असा आहे की, आपण अगोदरच्या लोनचे जे रिपेमेंट करतो ते बारा कोटी आहे. याचा वर्षाचा हप्ता साधारणपणे सहा कोटी पर्यंत आहे. आणि आपल्याला जे.एन.आर.यु.एम साठी काही प्रोव्हीजन करावे लागेल, ते पर इअर साधारण ४० - ४५ कोटी होणार आहे. आणि एक हजार कोटी आपल्याला बावीस वर्षामध्ये उभारायचे आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु) साो.) :-**

जे.एन.आर.यु.एम मध्ये आपल्याला शासन लोन देत नाही, अनुदान देते.

**प्रशांत पालांडे :-**

आपल्या आपले पन्नास टक्के उभे करावे लागतील ना?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु) साो.) :-**

आपले उभे करत असतांना आपल्या फंडातील काही पैसे करावे लागतील. असेच एम.एम.आर.डी.ए किंवा लोकल मार्केटमधुन आपल्याला उभे करावे लागतील.

**प्रशांत पालांडे :-**

माझ्या म्हणण्याचा उद्देश असा आहे की, आपण एवढ्या लोनचे बॉदरेशन घेतो आहे. आपण त्याचे रिपेमेट करु शकु का? माझ्या अंदाजाने आपल्याला साधारण ६२ कोटी रुपये कर्जाची परतफेड करण्यासाठी खर्च करावे लागतील.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु) सा़ो.) :-**

आपली परतफेडीची ऐपत असेल तरच आपल्याला कोणीही लोन देणार.आपण कोणाकडे ही लोन घ्यायला गेलो तर कोणी देणार नाही. आपले मागील तीन वर्षांचे स्टेंटमेंट तपासले जातात. आपले इंन्कम किती आहे ते तपासले जाते. जरी कोणतेही प्रस्ताव झाले तरी त्याची फिजीबिलीटी बघितल्याशिवाय लोन देत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आपल्याला आत्ता हे ५० कोटीचे लोन मिळालेले आहे. आपण ऑलरेडी १२ कोटी इंन्स्टॉलमेंट परतफेड करतो.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु) सा़ो.) :-**

ते बारा कोटीचे हप्ते सुध्दा पंधरा वर्षे भरायचे आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

माझे म्हणणे आहे की, बॉदरेशन खुप आहे. आपण तेवढे कॅपेबल आहेत का?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु) सा़ो.) :-**

या ५० कोटीला काही हरकत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे जवाहरलाल नेहरु योजनेसाठी सुध्दा आपल्याला.....

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु) सा़ो.) :-**

वेगळ्या पध्दतीने घ्यावे लागेल.सगळेच लोन घेउन चालणार नाही आपली जी चर्चा झाली. त्याप्रमाणे त्याच्यामध्ये वेगळे सोर्स आयडेन्टीफाय करावे लागतील.

**प्रशांत पालांडे :-**

आपण आत्ता पन्नास टक्के अनुदान घेणार आहोत, राज्य शासन आणि केंद्र शासन आपण मा. महासभेमध्ये ठराव मांडलेला की, आपण ८० टक्क्यापर्यंत विनंती करायची. की, केंद्र शासन आणि राज्य शासनाकडुन आपल्याला मिळावे. त्याचे पुढे काय झाले?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु) सा़ो.) :-**

त्याच्यामध्ये आपली पर्सनस रिक्वेस्ट मान्य होत नाही. आपण जरी ठराव केला. आपण शासनाला तसे कळवलेले आहे. पण त्यामध्ये केंद्र शासनाचे, राज्यशासनाचे जे रुल्स आहेत. त्याप्रमाणे ते होईल. दुसरा मुद्दा याच्यामध्ये कोणते रस्ते आहेत? या ५० कोटीमध्ये पाणी पुरवठ्यासाठी २९.६१ कोटी आहेत. अंडर ग्राउंन्ड ड्रेनेजसाठी आणि उर्वरीत ३०.६६ हे रस्ते आणि ड्रेनसाठी आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे भुयारी गटार आणि रस्तेपण जे.एन.आर.यु.एम मध्ये भुयारी गटारे आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

भुयारी गटार जे.एन.आर.यु.एम मध्ये आहेत. पण ३५ टक्के सेंट्रल गव्हर्नमेंट आणि १५ टक्के राज्य शासन. ५० टक्क्यांमधुन जो निधी उभा करायचा आहे. त्याच्यातुन आपण एम.एम.आर.डी.ए कडुन लोन आणि त्यातले २६ कोटी लोन आपल्याला मंजुर झाले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मी मघाशी तेच विचारले. म्हणजे हे जे.एम.आर.यु.एम मध्ये ऑलरेडी आहे ना?

**शिवाजी बारकुंड :-**

रस्ते नाहीत. गटारे आहेत. भुयारी गटारे नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु) सा़ो.) :-**

२९.६१ कोटी जे झाले तो आपला शेअर झाला या ५० टक्क्यामध्ये आपल्याला केंद्र शासनाचे, राज्य शासनाचे पैसे मिळणार आणि भुयारी गटाराची जी साडेचारशे किंवा चारशे तीस कोटीची योजना आहे. त्याचे फ्रिज वर्किंग सुर होणार हे जर केले तर.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्या कंडीशन दिल्या आहेत. त्याच्यामध्ये सात नंबर आणि दहा नंबरचे मराठीमध्ये सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

ह्या लोन ॲग्रीमेंटमध्ये जर काही वाद उद्‌भवले, म्हणजे एम.एम.आर.डी.ए आणि आपण जे घेतो. याच्यामध्ये काही वाद तयार झाले, तर त्याचे वाद कुठे मिटवावे ह्याच्यासाठी ते आर्बीट्रेशन असते.

**शिवाजी बारकुंड :-**

एम.बी.एम.सी. ने जर रोड आणि ड्रेनेजवर याच्या अगोदर जर खर्च केला असेल, तो सुध्दा आपल्याला रिइम्बर्समन्टमध्ये मिळु शकतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

आपण एम.एम.आर.डी.एम कडे ज्यावेळेस आपली ही ५० कोटीची योजना सादर केली याच्यामध्ये आपण कर्जाची वाट न पाहता जर काही कामे करत असाल आणि आपल्या फंडातुन त्याचा खर्च झाला असेल तर ते आपल्याला रिइम्बर्समेंट देणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता माझा प्रश्न आहे, जेसलपार्कची जी कल्वर्ट आहे, म्हणजे सबवे आहे तो आपण लवकर सुरु केला तर हरकत आहे काय?

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, जेसल पार्कच्या सबवे चा आणि याचा काही संबध नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता अशी कोणती कामे चालु आहेत का?

**शिवाजी बारकुंड :-**

होय चालु आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग त्याला याच्यातुन लोन लागेल का?

**शिवाजी बारकुंड :-**

लागणारच आहे. मा. महासभेने सर्व मान्यता दिल्यानंतर आपण डी.पी.रोडची कामे पुढे कार्यवाही केलेली आहे. आणि रोडसाठी २४ करोड आणि २६ कोटी अंडरग्राउंड साठी त्यातली रोडची कामे आपली चालु आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नंतर डी.पी रस्त्याचे मॅप आणि.....

**शिवाजी बारकुंड :-**

यादी दिली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. खतगांवकर साहेब, याच्यात मला एक विचारायचे आहे. एस्क्रो अकाउन्ट म्हणजे काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

एस्क्रो अकाउन्ट म्हणजे सेपरेट अकाउन्ट, आपण ५० कोटी घेत असतांना ६ कोटी वार्षिक भरायचे आहेत. त्याच्यासाठी दोन इन्स्टॉलमेंट मध्ये ते पैसे मागतात. तर ती रक्कम एकदाच तीन कोटी, किंवा सहा कोटी कोणी डायरेक्ट देवू शकत नाही. तर त्याचे सहा काटीचे वर्षाला किती हफ्ते होतात. तर त्याप्रमाणे ती रक्कम त्याच्यामध्ये जमा करत राहायची आणि ती रक्कम जेवढी होते. तेव्हा तो चेक द्यायचा अशी त्याची ॲग्रीमेंट आहे. वेगळे अकाउंन्ट ठेवुन महापालिकेने त्याच्यात रिइम्बर्समेंट करत राहायला पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

फक्त त्या लोन साठी

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

तो हेड रेज करत राहायला पाहिजे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

श्री. खतगांवकर साहेब, आपले जे डी.पी रस्ते सध्या चालु आहेत. त्या डी.पी रस्त्यासाठी जर खर्च लागत असेल किंवा ते काम पेंन्डीग असेल तर त्या रस्त्यासाठी काय करणार?

**शिवाजी बारकुंड :-**

ते आपल्या नगरपालिका निधीतुन असतील. हे लोन मधुन पास केलेले आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मनपा फंडातुन सध्या सुरु आहेत. पण अर्धवट राहिले. अशा रस्त्यासाठी काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

येणाऱ्या बजेटमध्ये घेता येतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दहा नंबरचे ते काय आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

जे.एन.आर.यू.एम. कडून सेंट्रल गर्व्हमेंटकडून ॲप्रुव्हल झाले आणि पन्नास टक्के ग्रँड मिळाल्यानंतर उरलेली रक्कम एम.एम.आर.डी.ए. देईल असा त्याचा अर्थ आहे. सिव्हरेज स्कीमसाठी गर्व्हमेंटने जर पन्नास टक्के ॲप्रुव्हल केली, सेंट्रल गर्व्हमेंटने ३५टक्के आणि राज्य शासनाने १५टक्के आणि उरलेले ५०टक्के एम.एम.आर.डी.ए लोन देईल.

**प्रशांत पालांडे :-**

त्या रोडमध्ये मिरारोडमध्ये जास्त काम नाही का?

**शिवाजी बारकुंड :-**

आत्ता कुठला रोड आहे किंवा नाही याच्यावर चर्चा नाही. ही सर्व रस्ते मा. महासभेने ॲप्रूव्हल दिलेलेच रस्ते आहेत.

**एस. ए. खान :-**

त्याच्यामध्ये मिरारोडचा एकसूद्धा नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब हे आजचे प्रपोजल नाही हे सर्व अगोदर पास झालेले आहे.

**एस. ए. खान :-**

आज मिरा रोडला गरज आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

आज गरज आहे जे असेल ते आपल्यापुढे नवीन फ्रेश बजेट येणारच आहे. त्याच्यात तुम्ही करु शकता. हे ऑलरेडी मा. महासभेने मान्याता दिलेली आहे.

**एस. ए. खान :-**

हा आत्ता जो वेस्टचा रोड आहे. तो कोणता रोड आहे?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

हे मा. महासभेने मान्यता देउन मगच हे सभेत आलेले आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

भाईंदर पश्चिमेचा जो रेल्वे समांतर रस्ता आहे, तो रस्ता आहे.

**एस. ए. खान :-**

तो कुठपर्यंत आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्या खाडीच्या अलीकडची जी बॉर्डर आहे. तिथंपर्यंत तो रस्ता आहे.

**एस. ए. खान :-**

तिथे आत्ता काहीच पॉप्यूलेशन नाही. जिथे राहायला कोणीही नाही तिथे रस्ता करतात. जिथे माणसे राहायला आहेत तिथे करत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मी सन्मा. सदस्यांना सांगतो की, दोन वर्षापूर्वी मा.महासभेने या सर्व कामांना मान्यता दिलेली आहे.

**एस. ए. खान :-**

ईस्टचा जो रस्ता आहे तिथे करायला पाहिजे. तर वेस्टला कोणी राहात नाही तिथे केले.

**शिवाजी बारकुंड :-**

ह्या स्किममधून हे सहा रस्ते आहेत.

**एस. ए. खान :-**

हे कोणी केले?

**शिवाजी बारकुंड :-**

दुसरा रस्ता असेल तो आपल्या निधीतून असेल.

**एस. ए. खान :-**

त्या रस्त्याला कोणीही राहायला नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

हा विषय मान्यता दिली त्यावेळेस व्हायला पाहिजे होता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एखादा रस्ता आपल्याला सर्वानुमते मान्य होत असेल तर बदल करा.

**शिवाजी बारकुंड :-**

पण साहेब, मा. महासभेने निर्णय दिला.

**एस. ए. खान :-**

मा. महासभेमध्ये आपल्याला बदल करता येईल. तुम्ही मा. महासभेमध्ये द्या.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. महासभेच्या दोन वर्षापूर्वीच्या प्रस्तावापुरती आपण सर्व कार्यवाही झालेली आहे. आत्ता त्यांनी प्रिन्सीपली लोनसुद्धा ॲप्रूव्हल केलेले आहे. फक्त त्याच्यासाठी ज्या अटीशर्ती आहेत, एवढाच प्रश्न आहे. अजून दुसरा रोड जर घ्यायचा असेल तर करंट बजेटमध्ये किंवा लोनमधून जर घ्यायचा असेल तर आपल्याला वेगळा प्रस्ताव करावा लागेल. त्या प्रस्तावात आपल्याला आत्ता बदल करता येणार नाही.

**शरद पाटील :-**

पण ज्यावेळेला मा. महासभेने मंजूरी दिली. त्यावेळेला आपणसुद्धा सभागृहामध्ये होते. त्यावेळेला आपण बोललात नाही. त्यावेळेला आपण काही बोलतच नव्हते. ठराव वाचत होते आणि ठरावाला मंजूरी देत होते.

**तुळशीदास म्हात्रे :-**

हा विषय खरोखरच चांगला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब जे.एन.आर.यू.एम. मध्ये जे रस्ते आहेत आणि हे जे रस्ते आहेत त्याची पूर्ण लिस्ट आपण आम्हांला नंतर देउ शकाल का?

**शिवाजी बारकुंड :-**

डी.पी.रोडची एक लिस्ट आणि जे.एन.आर.यू.एम. मध्ये जे घेतलेले आहेत. त्याची एक एक कॉपी सर्व सदस्यांना देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण जे डी.पी.रस्ते घेतले. मा. महासभेने मंजूरी दिली. हे बरोबर आहे. हे डी.पी. रस्ते करताना ए.टी.पी. ची मान्यता घेणे बंधनकारक आहे किंवा नाही? म्हणजे आपण ए.टी.पी. कडून हे डी.पी. रस्ते् आहेत आणि या रस्त्यांना ए.टी.पी. जे क्लिअरन्स सर्टीफिकेट देतात, ते घ्यायचे बंधनकारक आहे की नाही? का बांधकामाने रस्ते दिले आणि सुरु करायचे.

**मा. सभापती :-**

ए.टी.पी वालो ने पास किया होगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहब मैं बोल रहा हूॅं नही है। उन्होंने लिया है तो बताये।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

डेव्हलपमेंटच्या कामामध्ये डी.पी. रस्ते मंजुर आहेत त्याच्यात डिमार्केशन करण्यासाठी अडचण आली असेल तर केले जाते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे या सहा रस्त्यांना काही अडचण नाही?

**शरद पाटील :-**

दोन रस्त्याला अडथळे आहेत म्हणून ते विचारतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्याकडे जे कार्यकारी अभियंता श्री. वाकोडे आहेत. त्यांनी म्हटले आहे की, ह्या सहाही रस्त्यांच्या जागा व्हॅकेंट आहेत. कुठेही अडचण नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मला वाटते डी.पी.रोडमध्ये जी अडचण असते ती काढू शकतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्याला तो अधिकार आहे.

**शरद पाटील :-**

पण तिथे चार माळ्याची बिल्डिंग उभी झालेली आहे. मी श्री. वाकोडे साहेबांना दाखवतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दोन ठिकाणी रस्ता फिरवलेला आहे. तुम्ही सांगा अडचण नाही. आम्ही तुम्हांला नंतर पुराव्यासकट देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब आपण काशिमिरा रोड तयार केला. काशिमिरा रोड तयार करताना भरपूर अडचणी होत्या. पण त्यावेळेस जे आयुक्त होते, श्री. आर.डी.शिंदे साहेब आणि आपल्या सर्व सन्मा. नगरसेवकांनी सहकार्य केले आणि त्या सर्व अडचणी दूर केल्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

डी.पी. रस्त्यामध्ये काहीही आले तर ते काढण्याचे अधिकार महापालिकेला आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याला थोडी रिस्क घ्यायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. खतगांवकर साहेब, सहा माळ्याची बिल्डिंग उभी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या एका बिल्डिंगसाठी आपण अख्खा रस्ता थांबवू शकत नाही. तो रस्ता समजा ५० फूट कमी झाला. पण बाकीचा रस्ता होतो आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ए.टी.पी. ने असे सांगावे आणि याची इकडे प्रोसिडींगमध्ये नोंद व्हावी की, कुठल्याही रस्त्यामध्ये कोणती बाधीलकी नाही. आम्हांला फक्त एवढेच सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बांधिलकी असेल तर काढू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बाधिलकी मोठी आहे. ती तुम्ही काढू शकत नाही. यांना उत्तर देउ द्या.

**शरद पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब मा. महासभेत मंजूर झाले त्याला आम्ही विरोध करत नाही. आमचा त्याला विरोध नाही. पण तुम्ही आज सांगता की, हे जे डी.पी.रोड पास झालेले आहेत. याच्यामध्ये कुठेही अडथळा नाही. असे तुमचे म्हणणे आहे आमचे म्हणणे आहे तिथे अडथळा आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्य साहेब, सर्वजण मिरा भाईंदर मधील जाणकार लोक आहेत की एवढे डी.पी. रस्ते झाले. कुठलेही कधीही, आत्ताचे उदाहरण दिले छत्रपती शिवाजी महाराज मार्गाचे, डी.पी रोडमध्ये अडचण असेल तर कधी सामंजस्याने, कधी लॅन्ड ॲक्वीझीशनने त्या प्रकारे सर्व ठिकाणी कामकाज केलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हाला ए.टी.पी. ने एवढेच सांगावे की, आत्ता आजच्या घडीमध्ये आम्ही जेव्हा सेंगन केलेले आहे. कुठलेही नाही तुम्हालां आम्ही पुराव्यासकट देतो. तुम्हाला सहा माळ्याची बिल्डींग दाखवतो. बघु तुम्ही अडथळा कसा दुर करता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सहा माळ्याची बिल्डींग कोणत्या रस्त्यामध्ये आहे?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, शहराचा विकास होत असेल आणि कुठे अडथळे असतील तर महानगरपालिकेने त्यामध्ये लक्ष घालुन कार्यवाही करुन ते रस्ते विकसीत करावे. यासाठी ही सभा आमच्यातर्फे मंजुरी देत आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल,आपल्याला माहिती असेल तर सभागृहाला माहिती द्या.

**शरद पाटील :-**

साहेब, नगर रचनाने सांगावे की, कुठे ही अडथळा नाही. आणि दुसरी गोष्ट त्या डि.पी रोडमध्ये झोपड्या बनतात त्या पाहिल्यांदा तोडा.

**एस. ए. खान :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे शहरातील डी.पी रस्ता प्रकल्प व भुयारी गटार योजनेसाठी कर्जप्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सादर केला होता. दि. १५/१०/२००७ च्या पत्रान्वये ग्ग्ड्क़्ऋ यांनी डी.पी. रस्ते व भुयारी गटार योजनेसाठी रु. ५० कोटी खर्चास मंजूरी दिलेली आहे. क़्ट रोड मध्ये येणारे अडथळे महापालिकेने नियमानुसार त्वरीत दूर करुन मोजमाप, आखणीप्रमाणे क़्ट रोडचे बांधकाम करण्यांत यावे ग्ग्ड्क़्ऋ कडील कर्ज प्रस्तावाचे करारपत्रातील अटी शर्तीस ही सभा मंजूरी देण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

नियमाप्रमाणे हटवुन, रस्ता न फिरवता, रस्ता तसाच गेला पाहिजे अशी नोंद करा.

**मा. सभापती :-**

ठराव वाचुन कायम करण्यांत येत आहे. त्याच्यावर कार्यवाही व्हावी.

**प्रकरण क्र. २३ :-**

मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण कडुन डी.पी रस्ता, भुयारी गटार योजनेसाठी मंजुर केलेल्या कर्ज प्रस्तावातील अटीशर्तीस मंजुरी बाबत.

**ठराव क्र. १४:-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे शहरातील डी.पी रस्ता प्रकल्प व भुयारी गटार योजनेसाठी कर्जप्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सादर केला होता. दि. १५/१०/२००७ च्या पत्रान्वये MMRDA यांनी डी.पी. रस्ते व भुयारी गटार योजनेसाठी रु. ५० कोटी खर्चास मंजूरी दिलेली आहे. DP रोड मध्ये येणारे अडथळे महापालिकेने नियमानुसार त्वरीत दूर करुन मोजमाप, आखणीप्रमाणे DP रोडचे बांधकाम करण्यांत यावे ग्ग्ड्क़्ऋ कडील कर्ज प्रस्तावाचे करारपत्रातील अटी शर्तीस ही सभा मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. शफीक अहमद खान** **अनुमोदन :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २४ मिरा रोड येथील आरक्षण क्र. १९२,१९३ रक्तपेढी, शवगृह, वाचनालय, दवाखाना , प्रभाग कार्यालया करिता लिफ्ट बसविणे कामास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देणे बाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य श्री. एस.ए.खान साहब, आपको मा. महासभा की याद दिला रहा हु। अपने मा. महासभामे पुछा था कि, तरतुद मे इसका भी उल्लेख नही है की, २००७-२००८ आर्थीक बजेट मे इसका बॅलन्स है। या २००८-२००९ मे लेनेवाले है। तो यह बात आपको उचित लगती है क्या? मा. सभापती साहेब, मा. महासभेमध्ये जो गोंधळ झाला हॉस्पीटच्या साहित्य खरेदीवरुन फक्त आर्थीक व प्रशासकिय मंजुरीसाठी सन्मा. सदस्य श्री. एस.ए.खान साहेबांनी गोंधळ घातला होता असा आमचा आरोप आहे. आणि आज जेव्हा त्याचा हॉस्पीटलमध्ये लिफ्टची मागणी करतात. याच्यामध्ये आर्थीक व प्रशासकिय मंजुरी कुठल्या वर्षामधुन देणार आहेत ०७-०८, ०६-०७, याचा उल्लेख नाही. आणि तुम्ही निवीदा मागवायची मागणी आमच्याकडुन कशावरुन करता? यह विषय नही हो सकता इसमे कुछ दिया नही है।

**प्रशांत पालांडे :-**

श्री.खतगांवकर साहेब हा जो विषय आहे. याला मा. महासभेची मंजुरी आहे की कसे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण द्यायची आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

याच्यामध्ये एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर श्री. खांबित साहेबांनी सही केलेली आहे तर ती सही कधी केली? तुम्ही सांगितले की, त्यांना अधिकार दिलेलेच नाहीत.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, दोन-तीन प्रश्नांची उत्तरे देतो. सन २००७ -२००८ या आर्थीक वर्षामध्ये या कामाची आर्थिक तरतुद उपलब्ध आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

लिफ्टचे काम पण चालु आहे का?

**प्रशांत पालांडे :-**

कुठल्या हेडखाली आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

तीन कोटी तरतूद त्यामध्ये दोन कोटी अठ्ठावीस लाख खर्च झालेला आहे. ७१ लाख रुपये तरतुद शिल्लक आहे. त्यामधुन हा खर्च प्रस्तावित आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल ::-**

तिथे उल्लेख करा ना.

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्ही प्रश्न उपस्थित केला की, याच्यावर श्री. खांबित साहेबांची सही आहे. तर १५/१०ला मा. आयुक्तांकडुन मान्यता मिळालेली आहे. आणि कार्यकारी अभियंता यांना मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिल्यानंतर मा. स्थायी समितीला गोषवारा देण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे त्यांनी तो गोषवारा दिलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

७१ लाख तरतुद शिल्लक है। गये मा. महासभा मे आपने कहा था की, तरतुद नही है। पैसा नही है। यह नही आना चाहिए। तो फिर अभी कैसे आया, इसका जवाब आप दिजिए।

**शरद पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, आपण आत्ता, सांगता की, तरतुद आहे. मग मा. महासभेला जेव्हा अकाउन्टंटने असे उत्तर का दिले नाही की, तरतुद आहे?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील आणि आपले सर्व स्थायी समिती सदस्य, मी.सांगतो की, मा. महासभेमध्ये जो विषय होतो तो इकडे काढु नका.

**शरद पाटील :-**

याच्यासाठीच सांगतो की, जेव्हा लोकहिताचे काम असते तेव्हा आपण तिथे विरोध करता. हा विरोध करु नका आम्ही विरोध करत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, आपण हॉस्पीटलच्या इंस्ट्रयूमेंटचा विषय मा. महासभेत थांबवलेला. मग, त्या हॉस्पीटलमध्ये आपण लिफ्ट लावुन काय करणार? हॉस्पीटलच चालु होणार नसेल तर आत्ता तिथे लिफ्ट लावुन काय उपयोग आहे?

**मा. सभापती :-**

कामकाजासाठी हॉस्पीटल तयार केले पाहिजे. तिथे साहित्य पाहिजे.

**शरद पाटील :-**

त्याला विरोध केला होता.

**मा. सभापती :-**

डॉक्टरांच्या भरतीला विरोध केला होता.

**प्रशांत पालांडे :-**

ऑपरेशन थिएटर, अमुक - तमुक सगळ्याला विरोध झाला होता.

**शरद पाटील :-**

साहेब, साहित्यालासुध्दा विरोध होता. भरतीला विरोध झाला. पण तो विषयच वेगळा होता. साहित्य खरेदी करण्याचा विषय वेगळा होता.

**प्रशांत पालांडे :-**

ऑपरेशन थिएटरपासुन साहित्य होते.

**एस. ए. खान :-**

डॉक्टर आल्याशिवाय साहित्य कुठुन खरेदी करणार?

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तीन माळ्याची बिल्डींग आहे. त्याला तीन लिफ्ट मग आपल्याकडे भाईंदरला जे माच्छिमार्केट आहे, ते सुध्दा तीन माळ्यांचेच आहे. तुम्ही हॉस्पीटलसाठी दोन लिफ्ट घ्या. तिसरी लिफ्ट लावु नका जेव्हा तुमची इमारत होईल तेव्हा तिसरी लिफ्ट लावा.

**शरद पाटील :-**

मच्छी मार्केटला लोक चढतील. पण इकडे आजारी माणसे चढणार नाहीत म्हणुन पाहिजे.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही दोन लावा तिसरी कशाला लावता.

**टेरी परेरा :-**

मिरारोड येथे आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये महानगरपालिकेमार्फत रक्तपेढी, शवागृह, वाचनालय, दवाखाना व प्रभाग कार्यालयाकरिता इमारती बांधण्यात येत आहे. सदर इमारतीचे काम सुरु असून दवाखान्याकरिता च्ध्द्वड्ढड़ण्ड्ढद्ध थ्ढद्य व दवाखाना तसेच प्रभाग कार्यालयकरिता घ्ड्ढ्ठ्ठ्ठड्ढदढ़ड्ढद्ध थ्ढद्य बसविणे आवश्यक आहे. एकुण तीन लिफ्टकरीता रु. २४,७५,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामी निविदा मागवावयाच्या आहेत. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. २४ :-**

मिरा रोड येथील आरक्षण क्र. १९२,१९३ रक्तपेढी, वाचनालय,दवाखाना,प्रभाग कार्यालयाकरिता लिफ्ट बसविणे कामास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. १५ :-**

मिरारोड येथे आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये महानगरपालिकेमार्फत रक्तपेढी, शवागृह, वाचनालय, दवाखाना व प्रभाग कार्यालयाकरिता इमारती बांधण्यात येत आहे. सदर इमारतीचे काम सुरु असून दवाखान्याकरिता Stracher lift व दवाखाना तसेच प्रभाग कार्यालयकरिता Passenger lift बसविणे आवश्यक आहे. एकूण तीन लिफ्टकरीता रु. २४,७५,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामी निविदा मागवावयाच्या आहेत. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. टेरी परेरा.  अनुमोदक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २५, सन २००७ - २००८ या वर्षातील भाईंदर (पश्चिम) व भाईंदर (पुर्व) विभाग बाजार फी वसुली निविदे बाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्या वेळी जे रुलिंग दिले होते की, बाजार कमी का आला याचा आढावा सादर करणे. त्याच्याबद्दल काय आढावा आला आहे. कारण टिप्पणी नाही. तुम्ही मागील विषय घेतलेला आहे. पण त्याची टिप्पणी नाही. आढावा घेतला की नाही घेतला की प्रशासन या भुमिकेमध्ये कायम आहे?

**मा. सभापती :-**

प्रशासनाने सांगितले की, मा. आयुक्तांना टिप्पणी देण्याचे अधिकारी नाहीत. त्यामुळे आपल्याला टिप्पणी देण्यांत आलेली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टिप्पणीचा प्रश्न नाही. मागच्या वेळी असा विषय झाला की, ठेका कमी का आला? आपणच रुलिंग दिले होते की, शहरामध्ये ठेका का कमी येतो याची शहानिशा करुन आढावा देणे. महापालिकेचे जेव्हा नुकसान होते. ते नुकसान का होते? उद्या कोणी कोर्टामध्ये गेला आणि या ५० लाखाची भरपाई आमच्याकडून केली तर त्याला जबाबदार कोण? त्याला रिझन दिले पाहिजे ना. सन्मा. सदस्य श्री. एस.ए. खान साहब, आपका दि. २२/४/२००७ का ठराव है आपने लिखा है, की तीन बार निविदा लाने के बाबत ओपन टेंडर मंगाइए। आपका साईन दो बार है। तो अभी इसमे हम पंधरा आदमी फसेंगे। महापालिका का नुकसान है। दो-पाच लाख का फरक होता तो टिप्पणी मे दे सकते थे की डी.पी. रस्ते पर से अतिक्रमण हटाया है, रस्ते मे बाधित किया है। बहोत बडा डिफरन्स है।

**शरद पाटील :-**

४८ लाख का डिफरन्स है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, प्रशासनाने सुद्धा त्यांची भुमिका क्लीअर कट मांडलेली नाही. त्यांनी सगळे आपल्यावर टाकलेले आहे. तर प्रशासनाने म्हणावे की अशा अशा निविदा कमी आली आहे आणि ही निविदा मंजूर करण्यास आम्ही शिफारस करत आहे. त्यांनी असे म्हटले तरी आपण रिस्क घेउ शकतो. पण प्रशासनाने असे म्हटलेच नाही. त्यांनी सगळे आपल्यावर ढकललेले आहे.

**मा. सभापती :-**

त्या लोकांशी चर्चा केलेली आहे. तर त्या लोकांनी सांगितले की आपल्या रस्त्यावरील बाजार उठविण्यांत आल्यामुळे त्यांना ही वसूली कमी करण्यांत येते. काही वेळेला दोन वेळा नाही तीन वेळा निविदा मागवून शेवटी काहीच होत नाही. शेवटी-शेवटी तेवढे झालेले आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, रस्त्यावरुन बाजार हा पुर्वी सुद्धा उचललेला आहे. आणि त्या अँग्रीमेंटमध्ये स्पष्ट आहे की, त्या फेरिवाल्यांकडून ठेकेदाराने वसूली करु नये. तेव्हासुद्धा त्या पैशावरून तो ठेका गेलेला आहे. आत्ता कोणते रस्ते उठवले? जे नविन रस्ते आहेत ते उठवले असे कोणते रस्ते आहेत ते मला सांगा.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. २५ चा ठराव वाचून कायम करण्यांत येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अटीशर्तीमध्ये असे म्हटलेले आहे की, ना फेरिवाला क्षेत्रामध्ये त्यांनी वसूली करु नये. श्री. अजित पाटील साहेब बरोबर आहे ना? काय म्हटले आहे? ती अट परत एकदा वाचा जरा.

**अजित पाटील (कर निर्धारक व संकलक) :-**

महापालिकेने ठरवलेल्या ना फेरिवाला क्षेत्रात बाजार फी वसूली करु नये.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर समजा त्यांनी केली. तर तुम्ही काय ॲक्शन घेणार? त्या अटीशर्तीमध्ये तुम्ही नमुद केले नाही.

**शरद पाटील :-**

ते रस्ते उचलले होते ते कित्येक वर्षापासून उचलले होते. त्याने बाजार जातो. तर आत्ता बाजार कमी व्हायचा प्रश्न कुठे आला? आणि त्याने वसूली केली होती. त्यांच्याकडून आपण वसूली केली का? त्या ठेकेदाराकडून आपण परत वसूली केली आहे का? ज्या रस्त्यावर ना फेरिवाला क्षेत्रामधून फेरिवाल्यांकडून वसूली करायची नाही. तिकडे त्यांनी केलेली आहे. त्या ठेकेदाराकडून महापालिकेने वसूली केली आहे का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

काय करणार याचा आम्ही खुलासा मागतो.

**शरद पाटील :-**

मग एवढा कमी ठेका आला. त्याला मंजूरी देणे योग्य आहे का? आज इस्ट आणि वेस्टमधून महापालिकेचे ४८ लाखाचे नुकसान होते. तर या कमी आलेल्या ठेक्याला परवानगी देणे योग्य आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

मागे जी सभा तहकूब झाली. याच्यावर प्रशासनाने काय मत आहे? असे त्यांनी विचारले.

**शरद पाटील :-**

पण प्रशासनाने त्याच्यावर काहीच दिले नाही.

**अजित पाटील (कर निर्धारक व संकलक) :-**

कमी आले असे क्लीअरकट लिहिलेले आहे. शेवटी म्हटलेले आहे, तथापी सदरच्या निविदा जास्त दराच्या असल्या तरी सदर निविदा महापालिकेने अपेक्षित केलेल्या देकारापेक्षा कमी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कमी म्हणजे तुम्ही निर्णय काय घेणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

योग्य तो निर्णय घ्यावा. म्हणजे काय ते तुम्ही सांगा.

**अजित पाटील :-**

तीन वेळा प्रयत्न करुन असे आम्ही दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आत्ता मागचा जो गोषवारा होता त्यात क्लिअर म्हणता की सदर कामी निविदा मागवायच्या आहेत. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे म्हणजे तुम्ही आमच्याकडे शिफारस केली आहे. तशी तुम्ही याच्यामध्ये शिफारस केली आहे का?

**अजित पाटील :-**

याच्यामध्ये आम्ही वस्तुस्थिती सभागृहासमोर आणलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही शिफारस करा.

**अजित पाटील :-**

कमी दराचे आहेत असे इथे लिहिलेले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

निविदा किती वेळा काढल्या?

**अजित पाटील :-**

तीन वेळा काढल्या असे टिपणीमध्ये लिहिलेले आहेत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

काही फरक झाला का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

फरक झाला. प्रत्येक वेळी वाढले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रत्येक वेळी वाढला.

**शरद पाटील :-**

४५ लाख वाढले.

**शानू गोहिल :-**

२२ लाख, २० लाख वाढले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तिसरी बार २२ लाख बढ गया।

**शरद पाटील :-**

दोन्ही मिळून ४५ लाख वाढले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. श्री. खतगांवकर साहेब, एक महत्त्वाची गोष्ट आपण जी टिप्पणी दिलेली आहे, २००७-०८ या वर्षाकरिता बाजार फी वसूली म्हणजे आपले जे आर्थिक वर्ष मार्च २००८ ला संपते. मग तुम्ही २००७-०८ कोणते पकडता?

**अजित पाटील :-**

आत्ता ठेका मंजूर आहे तो बारा महिन्याचा आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही लिहिताना २००७-०८ लिहिता आणि २००८ ला आपले आर्थिक वर्ष मार्चला संपते.

**अजित पाटील :-**

ठेक्याचा पिरिएड बारा महिन्यांचा आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. अजित पाटील ते बारा महिन्यासाठी आहे की या मार्चपर्यंत?

**अजित पाटील :-**

बारा महिन्यांसाठी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही परत २००७-०८ लिहिलेले आहे.

**अजित पाटील :-**

या वर्षामध्ये काढलेला म्हणून ते आहे. आपण ठेका बारा महिन्यांसाठी मागवलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आजच्या मुदतीपासून बारा महिने असे तुम्ही लिहा.

**अजित पाटील :-**

ठेका बारा महिन्यांचा असतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण याच्यात तुम्ही लिहिले नाही. उद्या कोणी कोर्टात गेला. मार्च २००८ मध्ये संपते मग काय करणार?

**अजित पाटील :-**

ठेका बारा महिन्यांचा असतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण याच्यात उल्लेख नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री.  अजित पाटील साहेब तुम्ही कंडीशन क्र. २१ बघा.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आत्ता हे मागच्या दराने भरतात ना?

**अजित पाटील :-**

होय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मागचे दर ७२ लाख आहेत. आत्ता ६० लाख आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मग ते दर आत्ता भरतात ते कोणत्या दराने भरतात?

**अजित पाटील :-**

जुन्या दराने भरतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्यापेक्षा कमी.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आत्ता जी मागील कामकाजात वसूली होते...

**अजित पाटील :-**

ती मागच्या दराने होते. सॅक्शन प्रमाणाने होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही क्रमांक २१ दिलेले आहे. महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या बाजार फीप्रमाणे विक्रेत्याकंडून बाजार फी घ्यावी. जास्त फी घेतल्यास बाजार फी पंधरा टक्के अनामत महापालिका जप्त करुन कंत्राट रद्द केले जाईल याची नोंद घ्यावी म्हणजे तुम्ही कंडीशन टाकली. मग तुम्ही इथे असे का टाकत नाही, की महानगरपालिकेने ठरविलेल्या ना फेरीवाला क्षेत्रात बाजार फी वसूली करु नये आणि केल्यास काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्तापर्यंत तुम्ही किती वसूल केले हे पण सांगा.

**अजित पाटील :-**

अटीशर्ती आपल्या हातात आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण ह्या अटीशर्ती मोघम आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्तापर्यंत तुम्ही किती टक्के पॅनल्टी वसूल केली?

**अजित पाटील :-**

पॅनल्टी वसूल केलेली नाही.

**शरद पाटील :-**

आजपर्यंत तुम्ही पॅनल्टी वसूल केलेली नाही मग याच्यापुढे कराल याची काय गॅरेंटी आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब आत्ता जो ना फेरीवाला झोन चा विषय निघाला. त्यांच्याकडून सुध्दा हे ठेकेदार वसूल करतात. मग त्यांना उचलत का नाही?

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. २५ सन २००७-०८ या वर्षातील भाईंदर (पश्चिम) व भाईंदर (पूर्व) एका वर्षासाठी विभाग बाजार फी वसूली निविदेबाबत मा. स्थायी समिती ओपन लिलाव जाहिर करत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो स्थायी समितीच्या केबिनला घ्या.

**मा. सभापती :-**

तो मा. आयुक्तांकडे होईल. ही रुलिंग वाचून कायम करत आहे. आणि दहा हजाराची एफ.डी. करुन मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये यावे लागेल. त्यालाच बोली बोलायला दिली जाईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब दहा हजारापेक्षा जास्त ठेवा. माझे असे मत आहे की एक लाख रुपये ठेवा.

**मा. सभापती :-**

दहा लाखाची एफ.डी. घेउन येईल तोच बोली बोलेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बोली कुठून सुरु होणार आहे.

**मा. सभापती :-**

बोली ८५ पासून सुरु होणार.

**प्रकरण क्र. २५ :-**

सन २००७-०८ या वर्षातील भाईंदर (पश्चिम) व भाईंदर (पूर्व) विभाग बाजार फी वसूली निविदेबाबत (मा. स्थायी समिती दि. २७/१२/२००७ रोजीचे तहकूब प्रकरण क्र. १४)

**ठराव क्र. १६ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील भाईदर (पू.) व भाईदर (प.) विभागासाठी बारा महिने करीता बाजार फी वसूली करीता खालील प्रमाणे तीन वेळा निविदा मागविण्यांत आल्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **पहिली जाहीर निविदा सूचना प्रसिध्दी "दैनिक सागर" व "दैनिक सामना" दि. २८/०८/२००७** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **ठेकेदारांचे नांव** | **मनपा ने अपेक्षित केलेली देकाराची रक्कम** | **ठेकेदाराने निविदेसोबत सादर केलेली देकाराची रक्कम** |
| **भाईंदर (पश्चिम) विभाग** | | | |
| १ | श्री. देवानंद जयदेव किणी | रु. ८५,२१,०२५/- | रु. ३६,००,५५१/- |
| २ | श्री. सदानंद पद्माकर पाटील | | रु. ३५,५०,०००/- |
| ३ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | | रु. ३५,००,०००/- |
| ४ | श्री. अजय गंगाराम पवार | | रु. ३४,००,०००/- |
| **भाईंदर (पुर्व) विभाग** | | | |
| १ | श्री. अजय गंगाराम पवार | रु. ९२,५५,७९५/- | रु. ४०,००,०००/- |
| २ | श्री. देवानंद जयदेव किणी | | रु. ३६,५०,०००/- |
| ३ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | | रु. ३७,००,०००/- |
| **दुसरी जाहीर निविदा सूचना प्रसिध्दी "दैनिक महाराष्ट्र टाइम्स" व "दैनिक सकाळ" दि.२८/०९/२००७** | | | |
| **भाईंदर (पश्चिम) विभाग** | | | |
| १ | मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट | रु. ८५,२१,०२५/- | रु. ३८,००,०००/- |
| २ | मे. रिध्दीका इंटरप्रायझेस | | रु. ४०,००,१५१/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री. देवानंद जयदेव किणी | | रु. ४०,५०,०००/- |
| **भाईंदर (पुर्व) विभाग** | | | **शेरा** |
| १ | श्री. एस.पी. पाटील | रु. ९२,५५,७९५/- | भाईंदर (पुर्व) विभागाच्या प्राप्त निविदापैकी श्री. एस.पी. पाटील यांनी लिफाफा क्रमांक १ मध्ये बॅक सॉलसी जोडलेली नाही व मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट यांनी निविदेसोबत इसा-या रक्कमेचा धनाकर्ष जोडलेला नाही. त्यामुळे भाईंदर (पुर्व) विभागाच्या निविदेतील दराबाबतचा लिफाफा क्र.२ उघडण्यांत आलेला नाही. |
| २ | श्री. देवानंद जयदेव किणी | | |
| ३ | मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट | | |
| **तिसरी जाहीर निविदा सूचना प्रसिध्दी “दैनिक महानगर” व “दैनिक लोकमत”दि. २४/१०/२००७** | | | |
| **भाईंदर (पश्चिम) विभाग** | | | **प्राप्त निविदेतील रक्कम** |
| १ | श्री. एस.एम. इंटरप्रायझेस | रु. ८५,२१,०२५/- | रु. ५५,००,०००/- |
| २ | **मे. रिध्दीका इंटरप्रायझेस** | | **रु.६०,००,०००/-** |
| ३ | श्री. अजय गंगाराम पवार | | रु. ५८,००,०००/- |
| ४ | श्री. अतुल प्रभाकर ठाकूर | | रु. ५७,००,०००/- |
| **भाईंदर (पुर्व) विभाग** | | | **प्राप्त निविदेतील रक्कम** |
| १ | **मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी** | रु. ९२,५५,७९५/- | **रु. ६२,००,०००/-** |
| २ | श्री. अतुल प्रभाकर ठाकूर | | रु. ५६,००,०००/- |
| ३ | श्री. अजय गंगाराम पवार | | रु. ५७,००,०००/- |
| ४ | श्री. एस.एम. इंटरप्रायझेस | | रु. ५८,००,०००/- |

वरील प्रमाणे तीन वेळा प्राप्त झालेल्या निविदा हया महानगरपालिकेने निश्चित केलेल्या देकाराची रक्कम अनुक्रमे भाईदर (प.) रु. ८५,२१,०२५/- व भाईदर (पू.) रु. ९२,५५,७९५/- असताना तीसऱ्या वेळी भाईदर (प.) विभागाकरीता रु. ६०,००,०००/- व भाईदर (पू.) रु. ६२,००,०००/- हया देकारापेक्षा फारच कमी आहेत.

प्रशासनाने तीन वेळा प्रयत्न करुन देखील आलेल्या निविदेची रक्कम फारच कमी असल्याने पुन्हा एकदा जाहीररीत्या स्पर्धा होण्यासाठी सर्वाना भाग घेता यावा याकरीता जाहीर बोली पद्धतीने लिलाव बोलाविण्यांत यावा. सदर लिलावामध्ये भाग घेवू इच्छीणाऱ्यांकडुन रु. १०,००,०००/- रकमेचा महानगरपालिकेच्या नावे धनाकर्ष (डी. डी.) घेवून भाग घेता येईल अशी अट घालण्यांत यावी. सदर प्रकरणी त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी.

सदर ठराव वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- ॲड. एस. ए. खान.** **अनुमोदक :- श्रीम. नयना गजानन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २६ मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांना मंजूरी देणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उसमें बारा गाडी है ना?

**शानू गोहिल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात वाहने वाहन चालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाडयाने घेणे करीता जाहिर निविदा दै. मुंबई संध्या व दै. वृत्तमानस या वृत्तपत्रात दि.२५/०८/०७ रोजी नोटीस प्रसिध्दी केली असता खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या होत्या परंतु सदर निविदेतील दर अवाजवी असल्याने त्यांना इकडिल पत्र क्र.मनपा/वाहन/३५०/२००७-०८ दि.५/०९/०७ अन्वये वाटाघाटी करिता बोलवले असता खालील प्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | सर्वस्व इंटरप्रेनर | |
|---|---|---|---|
| | | प्रती दिन | ८० किमी नंतर प्रति किमी |

| | | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | मारुती इस्टीम (ए.सी.) | १४०१/- | **१२५०/-** | ११.११/- | **९/-** |
| २ | मारुती ओमनी (नॉन ए.सी) | ८७५/- | **८१०/-** | ६.७५/- | **६/-** |
| ३ | टाटा इंडीगो (ए.सी.) | १४८५/- | **१२००/-** | ९.९९/- | **९/-** |
| ४ | टाटा इंडीका (ए.सी) | १२२१/- | **१०७५/-** | ८.२१/- | **७/-** |
| ५ | टाटा इंडीका (नॉन ए.सी.) | ९९९/- | **८५०/-** | ७.२१/- | **६/-** |
| ६ | क्वालीस (नॉन ए.सी.) | १४२१/- | **१२००/-** | ८.२१/- | **७/-** |
| ७ | क्वालीस ( ए.सी.) | १८४१/- | **१४५०/-** | ९.९१/- | **८/-** |
| ८ | टाटासुमो/आर्माडा,नॉनए.सी | १३८१/- | **११२५/-** | ७.१५/- | **७/-** |
| ९ | ऑटो रिक्षा | ७२१/- | **५७५/-** | ६.५०/- | **३.५०/-** |
| १२ | ऑटो रिक्षा(ध्वनीक्षेपणासह) | ९९९/- | **७५०/-** | ६.५०/- | **३.५०/-** |
| १३ | टेम्पो (४०७) | १५५१/- | **१२२५/-** | ११.११/- | **११/-** |
| १४ | टेम्पो (४०७)ध्वनीक्षेपणासह) | १९९१/- | **१६५०/-** | ११.११/- | **११/-** |
| **अ.क्र.** | **तपशिल** | **सर्वस्व इंटरप्रेनर** | | | |
| | | **प्रती महिना** | | **२५०० किमी नंतर प्रति किमी** | |
| | | **निविदेतील दर** | **वाटाघाटी नंतरचे दर** | **निविदेतील दर** | **वाटाघाटी नंतरचे दर** |
| १ | मारुती इस्टीम (ए.सी.) | ३३८५१/- | **२९४५०/-** | ११.११/- | **९/-** |
| २ | मारुती ओमनी (नॉन ए.सी) | २१२२१/- | **१९४९५/-** | ६.७५/- | **६/-** |
| ३ | टाटा इंडीगो (ए.सी.) | ३२७७५/- | **२९४५०/-** | ९.९९/- | **९/-** |
| ४ | टाटा इंडीका (ए.सी) | २३९५१/- | **२०६६५/-** | ८.२१/- | **७/-** |
| ५ | टाटा इंडीका (नॉन ए.सी.) | २०४२१/- | **१८०२५/-** | ७.२१/- | **६/-** |
| ६ | क्वालीस (नॉन ए.सी.) | २४५२१/- | **२२३२५/-** | ८.२१/- | **७/-** |
| ७ | क्वालीस ( ए.सी.) | २७१११/- | **२४२२५/-** | ९.९१/- | **८/-** |
| ८ | टाटासुमो/आर्माडा,नॉनए.सी | २३२२१/- | **२१२०५/-** | ७.१५/- | **७/-** |
| ९ | ऑटो रिक्षा | १८७२१/- | **१६१५०/-** | ६.५०/- | **३.५०/-** |
| १२ | ऑटो रिक्षा(ध्वनीक्षेपणासह) | २९७२१/- | **२२५००/-** | ६.५०/- | **३.५०/-** |
| १३ | टेम्पो (४०७) | ४३६१५/- | **३६४९५/-** | ११.११/- | **११/-** |
| १४ | टेम्पो (४०७)ध्वनीक्षेपणासह) | ४९४४५/- | **४२३५०/-** | ११.११/- | **११/-** |

तरी मे.सर्वस्व इंटरप्रेनर यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे. तसेच ठेक्याची वाहने नॉन एसी वापरण्यास व प्राथमिक आरोग्य केंद्राची ५ वाहने कमी करुन त्यांना आवश्यकतेनुसार वाहने देणेस तसेच सन २००६-०७ मधील निविदा धारक मे.साई साई सिध्दी ट्रॅव्हल्स यांची मुदत दि.६/०९/०७ रोजी संपली असल्याने व दरम्यानचे कालावधीमध्ये महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक अभावी नविन निविदा मंजुर करता येत नसल्याने नव्याने मा. स्थायी समिती सभेची रचना झाल्यानंतर निविदा मंजुरीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतचा कालावधी दि.६/९/०७ ते दि. ०३/०१/२००८ पर्यंत मागिल ठेकेदारास मुदत वाढ देण्यास हि सभा मंजुरी देत आहे.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

विषय मंजूर.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब आपल्याकडे आत्ता ज्या नविन नविन गाडया आलेल्या आहेत टेम्पो बोला किंवा फोर व्हिलर बोला. ब-याचशा गाड्या आपल्या पालिकेच्या पण आहेत. समजा, गाडी बोलल्यानंतर ती बिघडते. जर ती गाडी बिघडली तर ती रिपेअरींगला डायरेक्ट कंपनीकडेच जावी असे माझे म्हणणे आहे कारण या गॅरेजला देतात त्या गॅरेजला देतात, त्याच्यातले काय काढतात आणि त्या गाडीत काय टाकतात ते आपल्याला काही माहिती पडत नाही. म्हणून त्या गाडया डायरेक्ट कंपनीत जाव्यात कारण आपल्या गाडया कितीतरी दिवस ब-याचशा गॅरेजला पडलेल्या असतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. खतगांवकर साहेब, आपली कार्यशाळा सुरु करणेबाबत आपण मा. महासभेला प्रस्ताव केला. तो प्रस्ताव पास होउन चार वर्षे झाली. मी आत्ता आणलेला नाही. आपल्या महापालिकेची कार्यशाळा ब्रीजच्या खाली उघडण्यास

प्रशासकीय व आर्थिक मंजूरी दिलेली आहे. त्याचा पाठपुरावा का करत नाही? कोणाला ठराव माहिती नाही का? त्या डिपार्टमेंटशी संबंधित कोण आहेत?

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे मॅडम, बोलल्या की त्या कंपनीत द्याव्या. कंपनीमध्ये गाडी दिल्यानंतरसुद्धा तोच विषय येणार आहे. जिथे रिपेअरिंगला जाते तिथे तरी आपल्या लोकांना बघायला मिळेल. ते बसून बघून कामे करुन घेतील. जर खरंच करायची इच्छा असेल आणि खरंच पालिकेचे मीठ खात असतील तर ते इथे बघू शकतील. कंपनीत काय केले आणि काय नाही ते बघायलासुद्धा देणार नाहीत आणि त्यांचा चार्ज जास्त असेल. सन्मा. सदस्य श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब आमच्यापेक्षा जास्त गाडया तुम्ही वापरल्या आहेत आणि तुम्हांला सगळे माहिती आहे. त्यांची काही गॅरेंटी नसते.

**एस. ए. खान :-**

आपल्या ड्रायव्हर लोकांची चूक आहे.

**शरद पाटील :-**

आपले ड्रायव्हर ज्या गाडीवर असतील त्या गाडीच्या बाजूला उभे राहून कधीच काम करुन घेत नाहीत. यांचे मत मी खोडत नाही. तुम्ही कंपनीला दिले तरी माझी काही हरकत नाही. पण कंपनीला दिल्यानंतर सुद्धा तिथे लक्ष दिले पाहिजे.

**एस. ए. खान :-**

आपले ड्रायव्हर गाडी व्यवस्थित चालवत नाहीत. स्वतःची गाडी असेल तर आपण कसे काळजीने वापरतो. खड्डयामध्ये जाउ नये कुठे पार्किंग करावी हे कुठेही पार्किंग करतात कसेही चालवतात.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपल्याकडे एकूण किती वाहने आहेत?

**नयना म्हात्रे :-**

सहा महिन्यांनी आपल्या गाडया जुन्या दिसतात.

**एस. ए. खान :-**

नेहमी त्या अशाच बिघडवतात आणि गॅरेजमध्ये टाकून ठेवतात.

**शरद पाटील :-**

आपले लोक लक्ष देतच नाही.

**एस. ए. खान :-**

काही तुटले की गॅरेजमध्ये टाकली आणि दोन ते तीन दिवस ड्रायव्हर आरामशिर बसून राहतो.

**मा. सभापती :-**

श्री. वाघ साहेब किती वाहने आहेत त्याची माहिती द्या.

**बाबुराव वाघ (वाहन विभाग प्रमुख ) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो आपली लहान व मोठी धरुन टोटल ७४ वाहने आहेत.

**नयना म्हात्रे :-**

लहान किती ते सांगा.

**बाबुराव वाघ (वाहन विभाग प्रमुख ) :-**

मोठी वाहने ३७ आहेत आणि लहान वाहने ३७ आहेत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

भाडयाच्या गाडया किती आहेत?

**बाबुराव वाघ (वाहन विभाग प्रमुख ) :-**

भाडयाच्या सध्या आपल्याकडे १८ गाडया चालू आहेत.

**नयना म्हात्रे :-**

भाड्याच्या १८ गाडया कोणाला दिल्या आहेत का?

**बाबुराव वाघ (वाहन विभाग प्रमुख ) :-**

अधिका-यांना दिल्या आहेत प्रभाग अधिकारी आहेत. क्षेत्रिय अधिकारी आहेत, अतिक्रमण, विद्युत विभाग.

**नयना म्हात्रे :-**

अतिक्रमणाला किती गाड्या आहेत?

**बाबुराव वाघ :-**

अतिक्रमणाला चार गाड्या आहेत.

**नयना म्हात्रे :-**

कोणाकडे आहेत ते जर सांगा.

**बाबुराव वाघ :-**

ते अतिक्रमण तोडायला वापरतात.

**तुळशिदास म्हात्रे :-**

आपण किती लोकांना पैस देतो?

**बाबुराव वाघ :-**

आपण २९ लोकांना पैसे देतो.

**नयना म्हात्रे :-**

आपण २९ लोकांना किती पैस दतो?

**बाबुराव वाघ :-**

दहा हजार रुपये २२ लोकांना देतो आणि तेरा हजार पाचशे रुपये सात लोकांना देतो.

**नयना म्हात्रे :-**

त्यांची नावे सांगा.

**बाबुराव वाघ :-**

त्यांची यादी तयार केलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ती यादी द्या.

**मा. सभापती :-**

ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २६ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांना मंजूरी देणे.

**ठराव क्र. १६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात वाहने वाहन चालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाडयाने घेणे करीता जाहिर निविदा दै. मुंबई संध्या व दै. वृत्तमानस या वृत्तपत्रात दि.२५/०८/०७ रोजी नोटीस प्रसिध्दी केली असता खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या होत्या परंतु सदर निविदेतील दर अवाजवी असल्याने त्यांना इकडिल पत्र क्र.मनपा/वाहन/३५०/२००७-०८ दि.५/०९/०७ अन्वये वाटाघाटी करिता बोलवले असता खालील प्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | सर्वस्व इंटरप्रेनर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रती दिन | | ८० किमी नंतर प्रति किमी | |
| | | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| १ | मारुती इस्टीम (ए.सी.) | १४०१/- | १२५०/- | ११.११/- | ९/- |
| २ | मारुती ओमनी (नॉन ए.सी) | ८७५/- | ८१०/- | ६.७५/- | ६/- |
| ३ | टाटा इंडीगो (ए.सी.) | १४८५/- | १२००/- | ९.९९/- | ९/- |
| ४ | टाटा इंडीका (ए.सी) | १२२१/- | १०७५/- | ८.२१/- | ७/- |
| ५ | टाटा इंडीका (नॉन ए.सी.) | ९९९/- | ८५०/- | ७.२१/- | ६/- |
| ६ | क्वालीस (नॉन ए.सी.) | १४२१/- | १२००/- | ८.२१/- | ७/- |
| ७ | क्वालीस ( ए.सी.) | १८४१/- | १४५०/- | ९.९१/- | ८/- |
| ८ | टाटासुमो/आर्माडा,नॉनए.सी | १३८१/- | ११२५/- | ७.१५/- | ७/- |
| ९ | ऑटो रिक्षा | ७२१/- | ५७५/- | ६.५०/- | ३.५०/- |
| १२ | ऑटो रिक्षा(ध्वनीक्षेपणासह) | ९९९/- | ७५०/- | ६.५०/- | ३.५०/- |
| १३ | टेम्पो (४०७) | १५५१/- | १२२५/- | ११.११/- | ११/- |
| १४ | टेम्पो (४०७)ध्वनीक्षेपणासह) | १९९१/- | १६५०/- | ११.११/- | ११/- |
| अ.क्र. | तपशिल | सर्वस्व इंटरप्रेनर | | | |
| | | प्रती महिना | | २५०० किमी नंतर प्रति किमी | |
| | | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| १ | मारुती इस्टीम (ए.सी.) | ३३८५१/- | २९४५०/- | ११.११/- | ९/- |
| २ | मारुती ओमनी (नॉन ए.सी) | २१२२१/- | १९४९५/- | ६.७५/- | ६/- |
| ३ | टाटा इंडीगो (ए.सी.) | ३२७७५/- | २९४५०/- | ९.९९/- | ९/- |
| ४ | टाटा इंडीका (ए.सी) | २३९५१/- | २०६६५/- | ८.२१/- | ७/- |
| ५ | टाटा इंडीका (नॉन ए.सी.) | २०४२१/- | १८०२५/- | ७.२१/- | ६/- |
| ६ | क्वालीस (नॉन ए.सी.) | २४५२१/- | २२३२५/- | ८.२१/- | ७/- |
| ७ | क्वालीस ( ए.सी.) | २७१११/- | २४२२५/- | ९.९१/- | ८/- |
| ८ | टाटासुमो/आर्माडा,नॉनए.सी | २३२२१/- | २१२०५/- | ७.१५/- | ७/- |
| ९ | ऑटो रिक्षा | १८७२१/- | १६१५०/- | ६.५०/- | ३.५०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | **ऑटो रिक्षा(ध्वनीक्षेपणासह)** | २९७२१/- | **२२५००/-** | ६.५०/- | **३.५०/-** |
| १३ | **टेम्पो (४०७)** | ४३६१५/- | **३६४९५/-** | ११.११/- | **११/-** |
| १४ | **टेम्पो (४०७)ध्वनीक्षेपणासह)** | ४९४४५/- | **४२३५०/-** | ११.११/- | **११/-** |

तरी मे.सर्वस्व इंटरप्रेनर यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे. तसेच ठेक्याची वाहने नॉन एसी वापरण्यास व प्राथमिक आरोग्य केंद्राची ५ वाहने कमी करुन त्यांना आवश्यकतेनुसार वाहने देणेस तसेच सन २००६-०७ मधील निविदा धारक मे.साई साई सिध्दी ट्रॅव्हल्स यांची मुदत दि.६/०९/०७ रोजी संपली असल्याने व दरम्यानचे कालावधीमध्ये महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक अभावी नविन निविदा मंजुर करता येत नसल्याने नव्याने मा. स्थायी समिती सभेची रचना झाल्यानंतर निविदा मंजुरीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतचा कालावधी दि.६/९/०७ ते दि. ०३/०१/२००८ पर्यंत मागिल ठेकेदारास मुदत वाढ देण्यास हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल.** **अनुमोदक :- श्रीम. सुनिता कै. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**उपसचिव :-**

प्रकरण क्र. २७, ठेका पध्दतीने लिपिक घेणेबाबत.

(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. २७ चा ठराव सभागृहासमोर मांडला.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा - भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर लिपीक संवर्गातील कर्मचारी अपुरे असुन महानगपालिकेच्या वेगवेगळ्या विभागाकरीता तसेच प्रभाग कार्यालये, विभागीय कार्यालयीन येथे नागरीकांची तसेच लोकप्रतिनिधीची कामे व कार्यालयीन कामे मोठ्या प्रमाणावर असतात परंतु महानगरपालिकेत लिपीक कर्मचारी कमी असुन कामाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर असल्याने महानगरपालिकेजवळ प्राप्त नागरीक व लोकप्रतिनिधी व शासनाचा पत्रव्यवहार योग्य वेळेत निपटारा होत नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधी, नागरीक यांचेत मोठ्या प्रमाणावर महानगरपालिकेकडुन कामे होत नाहीत म्हणुन नाराजी आहे.

तरी यापुर्वी महानगरपालिकेने ५० लिपीक ठेका पध्दतीवर घेतले होते. त्याप्रमाणे पुन्हा ५० लिपीक ठेका पध्दतीने विहीत पध्दतीचा अवलंब करुन घेण्यांस यावेत म्हणजे दैनंदिन कार्यालयीन कामे वेळेत पूर्ण करणे प्रशासकिय दृष्टीने सोयीचे होईल. त्यासाठी हि सभा ५० लिपीकांची नियुक्ती करण्यास. येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, एक विषय विचारतो. यापूर्वी मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०६/२००७ मध्ये हा ठराव मंजूर झाला होता. आत्ता जे लिपिक काम करतात, त्यांना पैसे दिले जात नाहीत. मागील पाच महिन्यांपासून जे काम करतात त्यांना पैसे दिलेले नाहीत. तरतुद नाही की काय ते माहिती नाही. पण एक ठराव आहे. श्री. खतगांवकर साहेब, ठराव असा आहे की, ठेका पध्दतीने लिपिक पुरवठा करणेबाबत प्राप्त निविदांबाबत विचारविनिमय करणे आणि वाढीव मंजुरी.

**मा. सभापती :-**

आत्ता वाढीव मंजूरी नाही. आता नविन ठेका काढणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठेका नही। जुना पगार की बात कर रहा हू। उनको अभी तक जो ६ महिने का पगार दिया नही है।

**मा. सभापती :-**

उनको पगार नही मिलेगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठरावामध्ये दिलेले आहे की, संगणक चालकांची मुदत जुन-जुलैमध्ये संपत आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांना ही कल्पना असायला पाहिजे की, हे कर्मचारी ठेक्याने होते, आणि ठेक्याची मुदत संपल्यानंतर मा. आयुक्तांनी त्यांचे आदेश रद्द केलेले आहेत. त्यांना वाढवून देण्याचा प्रश्न कुठे येतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

त्यांचा ठेका जेव्हापासून बंद केला त्या चार महिन्यांचा पगार त्यांना देण्यात येणार नाही का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी बोललो नाही. जो ठराव वाचून दाखवला त्याचे मला उत्तर द्या. ठराव असा आहे की, संगणक चालकांची मुदत जुन .......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

इथे विषय कोणता आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दोन्ही आहेत. यांनासुध्दा तुम्ही पगार दिला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणाला?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठेका पध्दतीवाल्यांना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

संगणक चालक ठेका पध्दतीने नाहीत. संगणक चालक मानधनावर आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इथे ठेका पध्दतीने लिहिले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तो मानधनावर घेण्यापूर्वीचा विषय होता. तुम्हाला काय म्हणायचे आहे ते स्पष्ट सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझा मुद्दा असा आहे, आपण संगणक चालक ठेका पध्दतीने घेतले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सध्या संगणक चालक ठेका पध्दतीने नाहीत. गेल्या एक वर्षापासून ते मानधनावर आहेत. त्यांची मुदत ३१ तारखेला संपलेली आहे. तरीपण आम्ही मा. आयुक्तांकडे त्यांना दोन महिन्यांची मुदत मिळावी म्हणून प्रस्ताव दिलेला आहे. तो मा. आयुक्तांकडे विचाराधीन आहे आणि मा. महासभेमध्ये याबाबत अजेंड्यावर विषय असून तो तहकुब आहे. संगणकाचा विषय इथे संपलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, मला एक उत्तर द्या की, ह्या लिपिक लोकांना पाच महिन्यांचा पगार मिळणार आहे की नाही?

**तुळशिदास म्हात्रे :-**

ठेका संपलेला आहे. सर्वांना वाढवून मिळतो मग यांना का मिळणार नाही?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

प्रशासनाने त्यांचा विषयच आणलेला नाही.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. २७ चा ठराव कायम करण्यांत येत आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आत्ता हा विषय नाही. तरी मी विचारतो. आत्ता संगणक चालकांची मुदत संपलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी तोच विषय क्लिअर केला. त्यांची ३१ तारखेला मुदत संपलेली आहे आणि ते आपल्याला आवश्यक आहेत. म्हणून त्यांचा मा. महासभेमध्ये काय निर्णय होईल तो झालेला नाही. म्हणून प्रशासनाकडून मा. आयुक्त महोदयांकडे दोन महिन्यांची मुदतवाढीचा प्रस्ताव आम्ही सादर केलेला आहे. त्यांना निश्चित मान्यता मिळेल.

**सुनिता पाटील :-**

यांची आवश्यकता होती. मग तुम्हाला त्यांची आवश्यकता नव्हती का?

**नयना म्हात्रे :-**

ज्या लिपिक लोकांनी पाच महिन्यापर्यंत काम केले त्यांना तो पगार मिळणार नाही का?

**मा. सभापती :-**

त्यांना मिळणार नाही. मी त्यांच्याशी चर्चा केलेली आहे. त्यांना ते मान्य झाले आहे.

**प्रकरण क्र. २७ :-**

ठेका पद्धतीने लिपीक घेणेबाबत.

**ठराव क्र. १७ :-**

मिरा - भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर लिपीक संवर्गातील कर्मचारी अपुरे असुन महानगपालिकेच्या वेगवेगळ्या विभागाकरीता तसेच प्रभाग कार्यालये, विभागीय कार्यालयीन येथे नागरीकांची तसेच लोकप्रतिनिधीची कामे व कार्यालयीन कामे मोठ्या प्रमाणावर असतात परंतु महानगरपालिकेत लिपीक कर्मचारी कमी असुन कामाची व्याप्ती

मोठ्या प्रमाणावर असल्याने महानगरपालिकेजवळ प्राप्त नागरीक व लोकप्रतिनिधी व शासनाचा पत्रव्यवहार योग्य वेळेत निपटारा होत नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधी, नागरीक यांचेत मोठ्या प्रमाणावर महानगरपालिकेकडुन कामे होत नाहीत म्हणुन नाराजी आहे.

तरी यापुर्वी महानगरपालिकेने ५० लिपीक ठेका पध्दतीवर घेतले होते. त्याप्रमाणे पुन्हा ५० लिपीक ठेका पध्दतीने विहीत पध्दतीचा अवलंब करुन घेण्यांस यावेत म्हणजे दैनंदिन कार्यालयीन कामे वेळेत पूर्ण करणे प्रशासकिय दृष्टीने सोयीचे होईल. त्यासाठी हि सभा ५० लिपीकांची नियुक्ती करण्यास. येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.

**सुचकः- श्री. ध्रुवकिशोर पाटील.        अनुमोदकः- श्री. तुळशीदास म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महागनरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सदस्या, सर्व अधिकारी तथा कर्मचारी वर्ग, आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल आपले सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दू. १.४० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**